(इंग्रजीमध्ये टंकलिखित केलेल्या न्यायनिर्णयाचा मराठी अनुवाद)

प्रकाशनयोग्य

भारताच्या सर्वोच्च न्यायालयात

दिवाणी मूळ अधिकारिता

रिट याचिका (दिवाणी) क्र. ४७३/२००५

संपूर्णा बेहुरा ..... याचिकाकर्ती

विरुद्ध

केंद्र सरकार आणि इतर ..... उत्तरवादी

न्यायनिर्णय

मदन बी. लोकुर, न्या.

१. जर शासनाने नागरिकाच्या मूलभूत किंवा मानवी किंवा वैधानिक अधिकारांकडे लक्ष दिले नाही किंवा आपले घटनात्मक किंवा वैधानिक कर्तव्य पार पाडण्यासाठी गंभीर स्वारस्य दर्शवले नाही, तर असा नागरिक काय करू शकतो ? जर असा नागरिक एक मूक बालक असेल किंवा कारभाराच्या कोलाहालात ज्याचा आवाज ऐकू शकता येत नसेल, - उदाहरणार्थ शारीरिकदृष्ट्या किंवा मानसिकरीत्या विकलांग व्यक्ती, ज्येष्ठ नागरिक आणि

समाजाचे इतर दुर्बल घटक जसे की अनुसूचित जाती, आदिवासी आणि इतर असंख्य, अशी व्यक्ती असेल तर ? अशी व्यथित व्यक्ती कदाचित मानवाधिकाराची अंमलबजावणी करण्यासाठी न्यायालयाकडे (जर त्याला किंवा तिला शक्य असेल तर किंवा शेवटचा उपाय म्हणून) येईल. न्यायव्यवस्थेने सुधारणात्मक पावले उचलून 'न्यायिक सक्रियतेचे' किंवा कुरघोडीचे आरोपी व्हावे का – किंवा मूक आणि दुर्बल घटकांची गाऱ्हाणी न ऐकण्यात सर्वतुच्छक आणि संशयी व्यक्तींचा दिवस पार पडावा का आणि मूलभूत आणि मानवी अधिकार विचारात घेतले जाऊ नयेत का?

२. मूक (आणि कधी कधी निःशब्द) बालकांच्या फायद्यासाठी असलेल्या कायद्यांची, विशेषतः बाल न्याय (मुलांची काळजी व संरक्षण) अधिनियम, २००० (सन २००० चा अधिनियम) आणि बाल न्याय (मुलांची काळजी व संरक्षण) अधिनियम, २०१५ (जेजे अधिनियम) यांची वस्तुतः अंमलबजावणी न करण्याच्या किंवा सुस्त अंमलबजावणी करण्याच्या संदर्भात हे प्रश्न उद्भवतात. जनहित याचिकेच्या माध्यमातून यातील काही मुद्दे ठळकपणे निदर्शनास आणण्याच्या संपूर्णा बेहुरा यांच्या प्रयत्नांची आणि ही प्रकरणे विरोधासाठी न करता, आपल्या देशातील बालकांच्या फायद्यासाठी विधायक प्रयत्न म्हणून यांतील काही मुद्द्यांचे निराकरण करणे आम्हांस शक्य व्हावे यासाठी मदत करणाऱ्या पक्षकारांच्या वतीने उपस्थित विद्वान वकिलांची आम्ही नोंद घेतो आणि त्यांची प्रशंसा करतो. आपल्या देशातील बालकांनासुद्धा मूलभूत अधिकार आणि मानवाधिकार आहेत आणि त्यांची

सुद्धा तितक्याच सबळतेने अंमलबजावणी करण्याची गरज आहे ही बाब शासनाने तीव्रतेने आणि अग्रसक्रियतेने मान्य करण्याची ही वेळ आहे, याबाबतीत कोणतीही शंका नाही.

३. जर नेल्सन मंडेला यांच्या शब्दांवर विश्वास ठेवायचा तर, " आपली मुले ही आपली सर्वात मोठी संपत्ती आहे. **ती आपले भविष्य आहेत. जे त्यांच्याशी गैरवर्तन करतात, ते समाजाची लक्तरे काढतात आणि देशाला** कमकुवत बनवतात."[1] आपल्या धोरणकर्त्यांनी आणि निर्णयकर्त्यांनी या सल्ल्याकडे आणि इशाऱ्याकडे लक्ष देण्याची गरज आहे आणि आपल्या देशातील बालकांची काळजी घेतल्याने ते त्यांच्यावर कोणतेही उपकार करीत नाहीत, तर ते त्यांचे घटनात्मक कर्तव्य आहे आणि संसदेने तयार केलेल्या सामाजिक न्यायाच्या कायद्यांची परिणामकारकतेने आणि अर्थपूर्वक अंमलबजावणी करण्याची आवश्यकता आहे, ही बाब त्यांनी समजून घेतली पाहिजे.

पार्श्वभूमी आणि मुख्य न्यायमूर्तींच्या परिषदा

४. बाल हक्कांच्या भविष्यकालीन जाणीवांकरिता सन २००६ मध्ये झालेल्या मुख्य न्यायमूर्तींच्या परिषदेमध्ये (ज्यामध्ये प्रत्येक उच्च न्यायालयाच्या मुख्य न्यायमूर्तींचा सहभाग असून त्याचे अध्यक्ष पद सरन्यायाधीशांनी भूषविले होते), खालील ठराव पारित करण्यात

---

1 दिनांक २२ नोव्हेंबर, १९९७ रोजी नॅशनल मेन्स मार्च, प्रेटोरिया येथे राष्ट्राध्यक्ष नेल्सन मंडेला यांनी केलेले भाषण.

आला होता :-

"(अ) असे की, जिथे बाल न्याय मंडळ स्थापन करण्यात आलेले नाही, तेथे ते स्थापन करण्यासाठी उच्च न्यायालये राज्य शासनाकडे हा मुद्दा प्रभावीपणे मांडतील. बाल न्याय (मुलांची काळजी व संरक्षण) अधिनियम, २००० अन्वये स्थापन करण्यात आलेल्या सुधार गृहांची/ निरीक्षणगृहांची स्थिती आणि कार्य यावर देखरेख करण्यासाठी मुख्य न्यायमूर्ती उच्च न्यायालयाच्या एका न्यायमूर्तीला नामनिर्देशित करतील.

(ब) जेथे बाल न्यायमंडळे अद्याप स्थापन करण्यात आलेली नाहीत, तेथे बाल न्याय मंडळे स्थापन करण्यासाठी उच्च न्यायालयाचे मुख्य न्यायमूर्ती संबंधित राज्य शासनाकडे प्रकरणात त्वरेने पावले उचलण्यास सांगतील.

(क) जेथे बालगृहे स्थापन करण्यात आली आहेत, तेथे नियमित भेटी देण्यासाठी उच्च न्यायालयाचे मुख्य न्यायमूर्ती एका न्यायाधीशास नामनिर्देशित करतील आणि विद्वान न्यायाधीश बालगृहे आणि सहिवासी यांची स्थिती सुधारण्याकरिता उपयुक्त उपाययोजना सुचवतील."

५. सन २००० च्या अधिनियमानंतर जवळजवळ सहा वर्षांनंतर वरील ठराव पारित

करण्यात आला होता - म्हणजेच बालकांच्या फायद्यासाठी संसदेने कायदा केल्यानंतर जवळपास सहा वर्षांनंतर सुद्धा बाल न्याय मंडळे स्थापन करण्याची कायद्यानुसार आवश्यक असलेली एक मूलभूत गरज पूर्ण करण्यासाठी राज्य शासनाने पावले उचलली नव्हती.

६. सन २००९ मधील मुख्य न्यायमूर्तींच्या परिषदेत बाल न्याय मंडळ स्थापन करण्यातील प्रगतीबद्दल चर्चा करण्यात आली आणि बाल न्याय मंडळे स्थापन करण्यात राज्य शासनांनी अद्यापही कमी किंबहुना काहीच प्रगती केली नसल्याचे दर्शवून, सन २००६ च्या परिषदेत पारित झालेल्या ठरावाचा पुनरुच्चार करण्यात आला. या प्रकारे, संसदेने आखून दिलेल्या मूलभूत वैधानिक कर्तव्याची पूर्तता राज्य शासनांनी न करण्यास जवळपास दशकभराचा कालावधी लोटला होता.

७. सन २०१३ मध्ये बाल न्याय यंत्रणेच्या सबलीकरणाच्या मुद्द्यावर पुन्हा मुख्य न्यायमूर्तींच्या परिषदेमध्ये चर्चा झाली आणि सन २००६ आणि २००९ मध्ये पारित केलेल्या ठरावांचा पुनरुच्चार करण्यात आला. त्याशिवाय, काळजी व संरक्षणाची गरज असलेल्या बालकांची आवश्यकता पूर्ण करण्यासाठी आणि सन २००० च्या अधिनियमातील तरतुदींना पूर्णपणे अंमलात आणण्यासाठी, सर्व जिल्ह्यांमध्ये बाल कल्याण समित्यांची स्थापना करण्याच्या आदेशावरसुद्धा भर देण्यात आला. पुढे असा ठराव करण्यात आला की,

> “ पुढे असा ठराव करण्यात आला की, बालकांच्या कल्याणासाठी आणि बाल न्याय (मुलांची काळजी व संरक्षण) अधिनियम, २००० नुसार कार्य करण्यासाठी ज्याप्रमाणे दिल्ली उच्च न्यायालयात मुख्य

न्यायमूर्ती आणि वरिष्ठ न्यायाधीश आणि संबंधित इतर व्यक्तींच्या मार्गदर्शनाखाली बाल न्याय समित्या स्थापन करण्यात आल्या होत्या, त्याप्रमाणे सर्व उच्च न्यायालयांमध्ये अधिनियमाच्या तरतुदींच्या खऱ्या अर्थाने होणाऱ्या अंमलबजावणीवर देखरेख करण्यासाठी समिती स्थापन करण्यात यावी.

असे निदर्शनास आले की, बाल न्याय (मुलांची काळजी व संरक्षण) अधिनियम, २०००, सन २००६ ची सुधारणा आणि बाल न्याय (मुलांची काळजी व संरक्षण) नियम २००७ मध्ये उल्लेख केल्यानुसार, विविध गृहांची स्थापना आणि उभारणी करण्यासाठी राज्य शासनांनी गंभीररित्या पावले उचलली नव्हती. असे निदर्शनास आले की, सुधार/ निरीक्षण गृहांची आणि आश्रमगृहांची स्थिती दर्जेदार नव्हती आणि वरील अधिनियमांमध्ये आणि नियमांमध्ये अभिप्रेत असल्यानुसार या सुविधा अर्थपूर्ण बनवण्यासाठी खूप सुधारणांची आवश्यकता होती. असेही निदर्शनास आले की, पौगंढावस्थेमधून प्रौढत्वाकडे जाणाऱ्या मुलांच्या, विशेषतः मुलींच्या संगोपनोत्तर गृहांचा मुद्दा संबंधित प्राधिकरणांनी गांभीर्यपूर्वक विचारात घेतला नव्हता. काही मुख्य न्यायमूर्तींनी अहवाल सादर केल्यानुसार गृहांमधील अनेक कर्मचारी जवळपास पंधरा वर्षांपासून

सुद्धा तदर्थ स्वरूपात कार्यरत होते आणि म्हणून वरील अधिनियमांमध्ये आणि नियमांमध्ये उल्लेख केलेल्या विविध गृहांची स्थिती सुधारण्यासाठी आणि सदर आस्थापना चालवण्यासाठी कायमस्वरूपी कर्मचारी वर्ग पुरवण्यासाठी मुख्य न्यायमूर्ती सदर बाब राज्य शासनांकडे मांडतील. तदर्थ स्वरूपावर कार्यरत असणाऱ्या अशा व्यक्तींच्या सेवा, गरज भासल्यास पदांची निर्मिती करून, नियमित करण्यासाठी सदर बाब राज्य प्राधिकरणांकडे मांडण्याची विनंती मुख्य न्यायमूर्तींना करण्यात आली.

बाल न्याय (मुलांची काळजी व संरक्षण) अधिनियम २००० च्या तरतुदींची अंमलबजावणी जम्मू आणि काश्मीर राज्यात अद्याप करण्यात आली नव्हती, या बाबीची विशेष नोंद घेण्यात आली."

८. सन २०१५ मध्ये बाल न्याय व्यवस्था सबलीकरणाच्या मुद्द्यावर पुन्हा एकदा मुख्य न्यायमूर्तींच्या परिषदेमध्ये चर्चा झाली आणि खालील ठराव पारित करण्यात आला :

"असा ठराव करण्यात येतो की, उच्च न्यायालये, आपापल्या संबंधित राज्यांमध्ये बाल न्यायाच्या क्षेत्रात प्रकरणे परिणामकारकरीत्या हाताळण्यासाठी, अधिक संवेदनशीलता सुनिश्चित करण्यासाठी मार्ग विकसित करण्यासह, सर्व आवश्यक पावले उचलण्याचे कार्य सुरू ठेवतील. बाल न्याय मंडळे आणि बाल कल्याण समित्या यांची

स्थापना योग्यरीत्या झाली आहे, बाल गृहे, विशेष गृहे, निरीक्षण गृहे, निवारा गृहे आणि बचाव केंद्रे इत्यादी ठिकाणी नियमितरीत्या भेटी दिल्या जातात आणि जेथे अशी गृहे याआधीच स्थापन करण्यात आलेली नाहीत, त्या ठिकाणी ती स्थापन करण्यात आली आहेत या बाबींची खात्री उच्च न्यायालयांनी करावी. अशा सर्व गृहांमध्ये/ केंद्रांमध्ये मानके, नियम, धोरणे आणि मार्गदर्शक तत्वांनुसार आवश्यक सुविधा पुरविण्यात आल्या आहेत याची सुद्धा त्यांनी खात्री करावी. यासंदर्भात राज्य विधी सेवा प्राधिकरणे आणि जिल्हा विधी सेवा प्राधिकरणे यांचे सुद्धा सहाय्य घेतले जाईल."

९. अखेरीस, सन २०१६ च्या मुख्य न्यायमूर्तींच्या परिषदेमध्ये खालील ठराव पारित करण्यात आला :

"कायद्याशी संघर्ष करीत असलेल्या बालकांना आणि काळजी व संरक्षण आवश्यक असलेल्या मुलांना संस्थात्मक आधाराची खात्री करण्याच्या आवश्यकतेची या परिषदेने नोंद घेतली."

असा ठराव करण्यात येतो की :

(i) एक वर्षापेक्षा अधिक काळ प्रलंबित असणारी प्रकरणे बाल न्याय मंडळांनी प्राधान्याने निकाली काढावीत ;

(ii) प्रलंबित आणि निकाली काढण्यात आलेल्या दत्तक प्रकरणांवर आणि मुलांना दत्तक पात्र म्हणून जाहीर करण्याच्या अर्जांच्या प्रकरणांवर उच्च न्यायालयांच्या बाल न्याय समित्या प्राधान्याने देखरेख करतील ;

(iii) प्रत्येक जिल्ह्यामध्ये बाल संरक्षण पथक, बालकांसाठी विशेष पोलीस पथक, निरीक्षणगृहे आणि बालगृहे सुसज्ज आहेत याची खात्री करण्यासाठी पावले उचलावीत ;

(iv) अनाथ, परित्यक्त आणि सोडून दिलेल्या मुलांच्या प्रलंबित प्रकरणांवर उच्च न्यायालयाच्या बाल न्याय समित्यांनी देखरेख करावी ;

(v) न्यायिक अधिकाऱ्यांना प्रशिक्षण आणि उजळणी प्रशिक्षण देण्यात यावे ;

(vi) बाल न्याय संस्थांमधील रिक्त पदे विशेष उपक्रम तत्वावर तीन महिन्यांत भरण्यात यावीत ; आणि

(vii) राज्य विधी सेवा प्राधिकरणांनी आपली भूमिका सक्रियपणे बजावावी.

१०. या टप्प्यावर, हे नमूद करता येईल की, मुख्य न्यायमूर्तींच्या परिषदांमध्ये पारित झालेल्या ठरावांनुसार, मुलांसंबंधीच्या प्रश्नांचा अंदाज घेण्यासाठी आणि त्यात लक्ष

घालण्यासाठी प्रत्येक उच्च न्यायालयाने उच्च न्यायालयाच्या न्यायमूर्तींच्या अध्यक्षतेखाली बाल न्याय समितीची स्थापना केली आहे. आम्ही हे नमूद करतो की, प्रत्येक उच्च न्यायालयाने खूप सकारात्मक पद्धतीने प्रतिसाद दिला आहे आणि प्रत्येक बाल न्याय समितीने, गृहांच्या राहणीमानाच्या स्थितीत आणि अनेक मुलांच्या कल्याणासाठी आणि जीवनासाठी काही सुधारणा घडवून आणल्या आहेत.

११. मुलांच्या सर्वोच्च हितासाठी प्रत्येकजण कृती करत आहे याची खात्री करण्याचे न्यायव्यवस्थेचे घटनात्मक कर्तव्य आहे हे जाणून घेऊन, सन २००० च्या अधिनियमातील मुद्द्यांची परिणामकारक अंमलबजावणी करण्याच्या मुद्द्यांना संबोधण्यासाठी सरन्यायाधीशांनी सर्वोच्च न्यायालयात एक समिती स्थापन केली - मुलांच्या हक्कांना न्याय व्यवस्थेने अशा प्रकारे महत्त्व दिले आहे.

१२. मागील जवळपास दशकभराच्या कालावधीत न्यायव्यवस्थेने 'न्यायिक सक्रियता' किंवा त्यातील टीका याद्वारे टोचूनही, मुलांच्या फायद्यासाठी संसदेने गंभीरतेने केलेल्या कायद्यातील तरतुदींचे पूर्णतः पालन राज्य शासनांनी आणि केंद्रशासित प्रदेशांनी केलेले नाही. अनेक प्रकरणांमध्ये, तळागाळाच्या स्तरावर केवळ दिखाऊ (वरवरचे) बदल दर्शवण्यात आले. परिणामी, निःशब्द मुले ही शासकीय उदासीनतेचा विषय बनत राहिली आहेत. परंतु, ही बाब मान्य केली पाहिजे की, मुलांच्या हक्कांना मान्यता देण्यासाठी आणि त्यांना

काही महत्त्व देण्यासाठी केंद्र शासनाने महिला व बालविकास मंत्रालयामार्फत (संक्षिप्ततेसाठी 'एमडब्ल्यूसीडी') काही धीट पावले उचलले आहेत. तरीही, मुलांच्या हक्कांना मान्यता देण्यासंदर्भातील आणि त्यांची जाणीव होण्यासंदर्भातील एकंदर चित्र हे समाधानकारक परिस्थितीपासून लांब आणि उदासीन आहे, कारण आपण एका लांब आणि गोलाकार मार्गावरून हळूहळू चालत राहिलो आहोत.

जनहितासाठी रिट याचिका

१३. आमच्या समोरील याचिकाकर्ती, संपूर्णा बेहुरा, हिने समाजशास्त्र विषयात पदव्युत्तर पदवी संपादन केली आहे आणि संबंधित वेळी ती याच विषयावरील तिच्या डॉक्टरेटच्या प्रबंधामध्ये गुंतली होती. बाल लैंगिक शोषण, रस्त्यावरील मुले आणि काम करणारी मुले यांची प्रकरणे हाताळण्यामध्ये ती गुंतली आहे आणि तिने बाल हक्कांबाबत विविध अभ्याससुद्धा हाती घेतले आहेत.

१४. देशातील मुलांच्या दुर्दशेबाबत चिंता वाटून संपूर्णा बेहुरा हिने, ज्याद्वारे मुलांच्या गरजा पूर्ण होतात आणि त्यांच्या मूलभूत मानवी हक्कांचे संरक्षण होते हे सुनिश्चित करण्याची राज्याची प्राथमिक जबाबदारी आहे, अशा राज्यघटनेच्या विविध अनुच्छेदांकडे लक्ष वेधत, घटनेच्या अनुच्छेद ३२ अंतर्गत रिट याचिका दाखल केली. तिने उल्लेख केलेल्या राज्यघटनेच्या अनुच्छेदांमध्ये, 'राज्य धोरणांची निदेशक तत्त्वे' या प्रकरणातील अनुच्छेदांचा

समावेश आहे. दिनांक २० नोव्हेंबर, १९८९ रोजी संयुक्त राष्ट्रांच्या महासभेने बाल हक्कांबाबतीत केलेल्या कराराकडे सुद्धा तिने लक्ष वेधले. या करारामध्ये, ज्यावर भारताने स्वाक्षरी केलेली आहे, इतर गोष्टींबरोबरच, मुलांचे सर्वोच्च हित, बाल बळींचे सामाजिक पुर्नएकात्मिकरण संरक्षित करणे इ. यांवर भर देण्यात आला आहे.

१५. रिट याचिकेमध्ये तिने असेही नमूद केले आहे की, बाल हक्कांवरील करार, संयुक्त राष्ट्रांचे बाल न्याय व्यवस्थापनासाठी प्रमाणभूत किमान नियम, १९८५ (बीजिंग नियम), स्वातंत्र्यापासून वंचित मुलांच्या संरक्षणासाठी संयुक्त राष्ट्रांचे नियम, १९९० आणि इतर संबंधित आंतरराष्ट्रीय लेख, यांतील विविध मानके लक्षात घेऊन संसदेने सन २००० चा अधिनियम पारित केला होता.

१६. सन २००० च्या अधिनियमातील विविध तरतुदींची अंमलबजावणी करण्यासह, इतर गोष्टींबरोबरच, बाल कल्याण समित्या, बाल न्याय मंडळे, बालकांसाठी विशेष पोलीस पथके यांची स्थापना तसेच काळजी व संरक्षण आवश्यक असलेल्या मुलांसाठी योग्य गृहांची स्थापना, कायद्याशी संघर्ष करीत असलेल्या मुलांच्या राहणीमानाच्या स्थितीतील सुधारणा, राज्य शासनाच्या ताब्यात असलेल्या मुलांसाठी वैद्यकीय सुविधा आणि इतर अनेक मानवी हक्कांच्या मुद्द्यांवर राज्य सरकारांना आलेले अपयश यांवर रिट याचिकेचा मुख्य भर आहे. ही व्यापक तथ्ये आणि दृढकथने यांआधारे जनहितासाठी दिलासा देण्याची विनंती करण्यात

आली होती.

१७. सन २००४-२००५ मध्ये विविध राज्यांत झालेल्या सर्वेक्षणांकडे आणि संशोधनांकडेसुद्धा रिट याचिकेमधून लक्ष वेधण्यात आले, पण जरी ते अर्थपूर्ण आणि महत्त्वाचे असले तरीही, काळाच्या ओघात त्यांची तात्काळ संबद्धता संपुष्टात आली असण्याच्या शक्यतेमुळे, विस्तृत तपशीलात त्यांचा उल्लेख करणे आवश्यक नाही.

१८. जनहित याचिकेमधील विनंती अशी आहे की, सर्व राज्यांतील मुख्य सचिव आणि पोलीस महासंचालक आणि पोलीस अधीक्षक यांनी सन २००० च्या अधिनियमाची खऱ्या अर्थाने ताबडतोब अंमलबजावणी करावी.

१९. अशीही विनंती करण्यात आली आहे की, विविध गृहांतील मुलांना पोषक आहार, योग्य आणि आरोग्यपूर्ण निवासव्यवस्था, शैक्षणिक सुविधा, मनोरंजनपर सुविधा आणि पुनर्वसन केंद्रे यांसारख्या मूलभूत सुखसोयी पुरविण्याचे निर्देश सर्व उत्तरवादी राज्य शासनांना देण्यात यावेत आणि या न्यायालयाच्या आदेशांची अंमलबजावणी करण्यासाठी नामांकित अशासकीय संस्थांचा समावेश करण्याचे निर्देश प्रत्येक जिल्ह्यातील जिल्हाधिकाऱ्यांना देण्यात यावेत.

२०. सन २००० चा अधिनियम आता निरसित झाला आहे आणि आता बाल न्याय

अधिनियम अस्तित्वात आहे. निरसित झालेल्या सन २००० च्या अधिनियमामुळे जनहित याचिकेमध्ये दावा करण्यात आलेल्या दिलाशांच्या सारांशामध्ये अजिबात बदल होत नाही. त्यामुळे जरी ही याचिका पूर्वी, म्हणजेच सन २००५ मध्ये दाखल केली असली, तरी विफल ठरत नाही आणि त्यात उपस्थित केलेले मुद्दे हे आजही प्रासंगिक आणि अस्तित्वात आहेत.

या न्यायालयासमोरील कामकाज

२१. रिट याचिका प्रथम दिनांक २६ सप्टेंबर, २००५ रोजी विचारार्थ घेण्यात आली आणि तेव्हा सर्व उत्तरवादींना (केंद्र सरकार आणि राज्य सरकारे) नोटीस जारी करण्यात आली. नोटीशीची बजावणी झाल्यानंतर (ज्याकरिताच जवळपास एक वर्षाचा कालावधी लागला), प्रकरण दिनांक ३ जानेवारी, २००७ रोजी घेण्यात आले आणि असे निरीक्षण नोंदविण्यात आले की, सन २००० च्या अधिनियमाची तात्काळ, खऱ्या अर्थाने अंमलबजावणी करण्याची विनंती रिट याचिकेत करण्यात आली होती आणि बऱ्याच वर्षांचा कालावधी लोटल्यानंतरही सदर अधिनियमातील काही तरतुदींची अंमलबजावणी करण्यात आली नव्हती, ही बाब रिट याचिकेतून ठळकपणे निदर्शनास आणून देण्यात आली होती. असे नमूद करण्यात आले होते की, मुलांच्या काही गृहांमधील भयंकर स्थितीवर रिट याचिका प्रकाश टाकते आणि ही बाब राज्यघटनेच्या अनुच्छेद २१ चे उल्लंघन करणारी होती. अशा परिस्थितीत, उत्तरवादी राज्य सरकारांनी प्रत्येक राज्याच्या मुख्य सचिवांमार्फत तपशीलवार शपथपत्र दाखल करण्याची आवश्यकता न्यायालयाने व्यक्त केली.

२२. दिनांक ३ जानेवारी २००७ रोजीच्या आदेशामध्ये, **शीला बारसे II विरुद्ध केंद्र सरकार**[2] या प्रकरणाचा उल्लेख करण्यात आला होता, ज्यामध्ये देशातील विविध तुरुंगांमध्ये 'सुरक्षित कोठडी' मध्ये ठेवण्यात आलेल्या परित्याग केलेल्या आणि निराधार मुलांचे प्रकरणसुद्धा हाताळण्यात आले होते. त्या निर्णयामध्ये असे नमूद करण्यात आले होते की, मुलांच्या कल्याणासाठीच्या राष्ट्रीय धोरणामध्ये खालील प्रास्ताविक समाविष्ट होते :

‘देशाची मुले ही सर्वोच्च महत्त्वाची संपत्ती आहे. त्यांचे संगोपन करणे आणि त्यांची काळजी घेणे ही आपली जबाबदारी आहे. मानवी साधनसंपत्तीच्या विकासासाठी, आपल्या राष्ट्रीय योजनांमध्ये मुलांसाठीच्या कार्यक्रमांचा महत्वाचा भाग असणे आवश्यक आहे, जेणेकरून आपल्या मुलांची वाढ सुदृढ नागरिक, शारीरिकदृष्ट्या तंदुरुस्त, मानसिकदृष्ट्या सतर्क आणि नैतिकदृष्ट्या निरोगी, समाजाला आवश्यक असलेले कौशल्य आणि प्रेरणा संपन्न, अशी होईल. वाढीच्या काळात सर्व मुलांना विकासाची समान संधी देणे हे आपले उद्दिष्ट असले पाहिजे. कारण त्यामुळे विषमता कमी करणे आणि सामाजिक न्याय सुनिश्चित करणे ही आपली मोठी उद्दिष्टे साध्य होतील.’

२३. त्या निर्णयामध्ये न्यायालयाने असे नमूद केले होते की, जर मूल हे राष्ट्रीय संपत्ती (राष्ट्रीय धोरणानुसार) आहे, तर त्याच्या व्यक्तिमत्त्वाच्या पूर्ण विकासाची खात्री करण्याच्या

2 (१९८६) ३ एससीसी ६३२

दृष्टीने त्या मुलाची काळजी घेणे हे राज्याचे कर्तव्य आहे आणि म्हणून मुलांविषयी असलेल्या कायद्यांमध्ये अशी तरतूद करण्यात आली आहे की, मुलांना तुरुंगात ठेवले जाणार नाही. असे निर्देश देण्यात आले होते की, कोणत्याही प्रसंगी एखाद्या मुलाला तुरुंगात ठेवू नये आणि जर राज्य सरकारकडे सुधारगृहांमध्ये किंवा निरीक्षणगृहांमध्ये मुलांना ठेवण्यासाठी पुरेशी निवासव्यवस्था नसेल तर, त्यांना तुरुंगात बंदी म्हणून ठेवण्यापेक्षा, त्यांची जामिनावर सुटका करावी.

२४. या बाबीवरसुद्धा भर देण्यात आला की, प्रत्येक जिल्ह्यात बाल न्यायालये स्थापन करणे आवश्यक आहे आणि मुलांविरुद्ध असलेली प्रकरणे हाताळण्याचे योग्य प्रशिक्षण देण्यात आलेल्या दंडाधिकाऱ्यांचा विशेष संवर्ग असला पाहिजे. इतर काही निर्देशसुद्धा देण्यात आले होते, पण ते मुलांबाबतीतील अधिनियमांपासून उद्भवलेले होते आणि सद्य परिस्थितीत ते गैरलागू आहेत. शीला बारसे विरुद्ध केंद्र सरकार[3] या प्रकरणातील आदेशाचासुद्धा संदर्भ देण्यात आला होता, ज्यामध्ये या न्यायालयाने वर नमूद केलेल्या आपल्या निर्णयाचा पुनरुच्चार केला होता.

२५. असे नमूद करण्यात आले होते की, फार कमी जिल्ह्यांमध्ये सन २००० च्या अधिनियमा अंतर्गत, बाल न्याय मंडळ (संक्षिप्ततेसाठी 'जेजेबी') आणि बाल कल्याण

3 (१९८८) ४ एससीसी २२६

समित्या (संक्षिप्ततेसाठी 'सीडब्ल्यूसी') स्थापन करण्यात आल्या होत्या. असेही नमूद करण्यात आले होते की, काही निरीक्षण गृहे ही गणवेशधारी किंवा सशस्त्र पोलिसांचा समावेश असलेल्या तुरुंगांप्रमाणे होती.

२६. नंतरच्या काही सुनावणींनंतर आणि वादकथने पूर्ण झाल्यानंतर, न्यायालयाने दिनांक १४ फेब्रुवारी, २०११ च्या आदेशान्वये बाल हक्कांच्या सुरक्षेकरिता राष्ट्रीय आयोग ('एनसीपीसीआर') आणि दिनांक ११ जुलै, २०११ च्या आदेशान्वये राष्ट्रीय विधी सेवा प्राधिकरण (संक्षिप्ततेसाठी 'एनएएलएसए') यांचा पक्षकार म्हणून समावेश केला. दिनांक १९ ऑगस्ट, २०११ रोजी झालेल्या सुनावणीमध्ये 'एनएएलएसए' ने बाल हक्कां संदर्भात काही सूचना केल्या. आम्ही या निवेदनांचा योग्य टप्प्यावर विचार करू.

२७. **सुनावणी दरम्यान प्रत्येक जिल्ह्यातील कायद्याशी संघर्ष करीत असलेल्या बालकांच्या संख्येसंदर्भातील आणि अशा बालकांच्या तपशीलासंदर्भातील आकडेवारीच्या उपलब्धतेबाबतीतील संदिग्धता आणि अ**निश्चितता यांबाबत न्यायालयाने खंत व्यक्त केली. यामुळे विधी सेवा पुरविण्यासाठी किंवा योग्य गृहे पुरविण्यासाठी परिणामकारक आराखडा बनवणे कठीण झाले. म्हणून राज्य विधी सेवा समिती प्राधिकरणाद्वारे आकडेवारी गोळा करण्याची आणि एनएएलएएसए ने सदर आकडेवारी पुढील निर्देशांसाठी न्यायालयासमोर उपलब्ध करण्याची आवश्यकता व्यक्त करण्यात आली. न्यायालयाने असेही निरीक्षण नोंदविले की, प्रत्येक जिल्ह्यात सीडब्ल्यूसी आणि जेजेबी कार्यरत नाहीत किंवा स्थापन

करण्यात आलेले नाहीत. त्यानुसार राज्य विधी सेवा प्राधिकरणांना विनंती करण्यात आली की, त्यांनी राज्य शासनाच्या योग्य विभागाशी समन्वय साधून सन २००० च्या अधिनियमानुसार सीडब्ल्यूसी आणि जेजेबी स्थापन करण्यात आल्याची खात्री करावी.

२८. दिनांक १९ ऑगस्ट, २०११ च्या आदेशानुसार सन २००० च्या अधिनियमाच्या अंमलबजावणीसाठी एनएएलएसए ने विद्यमान सुविधांवर, माहे ऑगस्ट २०१८ पासून प्रतिवेदन केलेला, तीन भागांतील एक तपशीलवार आणि उत्कृष्ट अहवाल तयार केला.

२९. दिनांक १२ ऑक्टोबर, २०११ रोजी जेव्हा प्रकरण पुन्हा सुनावणीसाठी घेण्यात आले, तेव्हा न्यायालयाने दिनांक १९ ऑगस्ट, २०११ रोजी पारित केलेल्या निर्देशांच्या अर्थाचा पुनरुच्चार केला आणि सन २००० च्या अधिनियमाच्या कलम ६३ अन्वये बालकांसाठी विशेष पोलीस पथक स्थापन करण्यावरसुद्धा भर दिला. या संदर्भात गृह विभागास आणि सर्व राज्यांच्या आणि केंद्रशासित प्रदेशांच्या पोलीस महासंचालकांना निर्देश देण्यात आले की, त्यांनी आवश्यक अभियोग्यता असलेला आणि बालकांचा किंवा मुलांचा कल्याण अधिकारी म्हणून कार्य करण्यासाठी योग्य प्रशिक्षण आणि दिशा निदेशन देण्यात आलेला किमान एक पोलीस अधिकारी प्रत्येक पोलीस ठाण्यामध्ये असल्याची खात्री करावी. अशा अधिकाऱ्यांना टप्प्याटप्प्यांत आवश्यक प्रशिक्षण आणि दिशा निदेशन देण्यासाठी राज्य विधी सेवा प्राधिकरणांना आणि 'एनएएलएसए' ला विनंती करण्यात आली.

३०. गृह विभागास आणि पोलीस महासंचालकांना असेही निर्देश देण्यात आले की, त्यांनी

सन २००० च्या अधिनियमाच्या कलम ६३ च्या पोट-कलम (३) अन्वये आवश्यक असल्यानुसार, कायद्याशी संघर्ष करीत असलेल्या बालकांना आणि काळजी व संरक्षणाची आवश्यकता असलेल्या मुलांना हाताळण्यात समन्वय साधण्यासाठी आणि त्यांचा दर्जा सुधारण्यासाठी प्रत्येक जिल्ह्यात आणि शहरात बालकांसाठी विशेष पोलीस पथके स्थापन करण्यात आली आहेत याची खात्री करावी.

३१. दिनांक ११ सप्टेंबर, २०१५ रोजी या न्यायालयाच्या सामाजिक न्याय खंडपीठाने जेव्हा प्रकरण सुनावणीसाठी घेतले, तेव्हा असे निदर्शनास आले की, केंद्र सरकारने दिनांक ३१ जुलै, २०१५ आणि दिनांक ९ सप्टेंबर,२०१५ रोजी शपथपत्रे दाखल केली होती. या शपथपत्रांचे वाचन केल्यावर असे दिसून आले की, सन २००० च्या अधिनियमातील तरतुदींनुसार अनेक गृहांची नोंदणी करण्यात आली नव्हती. हा चिंतेचा विषय असल्याने (ज्यात मुलांच्या अपव्यापाराची शक्यता आहे), केंद्र सरकारतर्फे उपस्थित विद्वान अतिरिक्त महाधिवक्ता यांना या प्रकरणात लक्ष घालण्याची विनंती करण्यात आली आणि त्यांनी असे सादर केले की, सन २००० च्या अधिनियमानुसार अशासकीय संस्थांमार्फत चालविण्यात येणाऱ्या गृहांची काही महिन्यांच्या कालावधीत नोंदणी केली जाईल याची खात्री करण्यासाठी केंद्र सरकारने पावले उचलली होती.

३२. त्यानंतर लवकरच, संसदेने दिनांक १५ जानेवारी, २०१६ रोजी बाल न्याय अधिनियम

पारित करून अंमलात आणला. जेजे अधिनियमामुळे बाल न्याय व्यवस्थेमध्ये अनेक बदल झाले, परंतु संपूर्णा बेहुरा यांनी दाखल केलेल्या याचिकेतील मूलाधार अबाधित राहिला.

३३. वरील पार्श्वभूमीवर तिची जनहित याचिका दिनांक १५ फेब्रुवारी, २०१६ रोजी सुनावणीसाठी घेण्यात आली आणि पक्षकारांच्या विद्वान वकिलांचे म्हणणे ऐकून घेतल्यानंतर आणि या न्यायालयाने वेळोवेळी दिलेल्या आदेशांचे अवलोकन केल्यानंतर, गांभीर्याने विचारात घेण्यासाठी आणि विमर्षासाठी आवश्यक असलेले खालील मुद्दे निश्चित करण्यात आले :

१. राज्य बाल संरक्षण सोसायटीची स्थापना.

२. राज्य बाल हक्क संरक्षण आयोगाची स्थापना.

३. प्रत्येक जिल्ह्यात बाल न्याय मंडळांची (जेजेबी) स्थापना (गरज भासल्यास, काही जिल्ह्यांत एकापेक्षा अधिक) आणि त्यांचे प्रशिक्षण.

४. बाल कल्याण समित्यांची (सीडब्ल्यूसी) स्थापना आणि त्यांचे प्रशिक्षण.

५. परिवीक्षा अधिकाऱ्यांची नियुक्ती आणि त्यांचे प्रशिक्षण.

६. प्रत्येक पोलीस ठाण्यात मुलांसाठी विशेष पोलीस पथकाची स्थापना, त्यांचे प्रशिक्षण आणि पोलीस प्रशिक्षण संहिता अद्ययावत करणे.

७. विधी सेवा वकिलांची तरतूद आणि त्यांचे प्रशिक्षण.

८. जेजेबी आणि सीडब्ल्यूसी च्या सदस्यांची योग्य निवड.

९. जेजेबी आणि सीडब्ल्यूसी ची मनुष्यबळ आवश्यकता निर्धारित करणे आणि रिक्त पदे भरणे.

१०. राज्य शासनांनी त्रैमासिक अहवाल ऑनलाइन पद्धतीने सादर करणे.

११. सामाजिक अन्वेषण अहवालाचे महत्त्व.

१२. मुख्य दंडाधिकाऱ्यांनी केवळ बाल न्याय चौकश्या हाताळणे आवश्यक आहे.

१३. मुलांच्या काळजीवाहू संस्थांची नोंदणी.

१४. शासनातर्फे चालविण्यात येणाऱ्या मुलांच्या काळजीवाहू संस्थांमधील राहणीमानाच्या स्थितीमध्ये सुधारणा.

१५. बाल न्याय निधी स्थापन करणे.

३४. त्यानंतर जेव्हा दिनांक ९ मे, २०१६ रोजी प्रकरण सुनावणीसाठी घेण्यात आले, तेव्हा विद्वान अतिरिक्त महाधिवक्ता यांनी असे सांगितले की ऑनलाईन पद्धतीने माहिती गोळा करण्याची आणि ती अदययावत करण्याची कार्यवाही महिला व बालविकास कल्याण मंत्रालयामध्ये सुरू आहे आणि ती वेगाने सुरू आहे आणि ती लवकरच पूर्ण होईल अशी आशा त्यांनी व्यक्त केली. त्यांनी असेही सांगितले की, जेजेबी आणि सीडब्ल्यूसी च्या सदस्यांसारख्या विविध स्थानी असलेल्या व्यक्तींची नावे महिला व बालकल्याण मंत्रालयाच्या वेबसाईटवर देण्यात येतील, जेणेकरून आवश्यकता असताना त्यांच्याशी संपर्क साधणे सोपे होईल. विद्वान अतिरिक्त महाधिवक्ता यांनी असे सांगितले की, प्रकल्प पूर्ण करण्यासाठी

राज्य शासनांच्या आणि केंद्रशासित प्रदेशांच्या साहाय्याची आवश्यकता आहे. त्यानुसार या न्यायालयाने राज्य शासनांना आणि केंद्रशासित प्रदेशांना असे निर्देश दिले की, त्यांनी माहिती अदययावत करण्यासाठी आणि ती वेळोवेळी अदययावत ठेवण्यासाठी केंद्र सरकारला आवश्यक साहाय्य करावे.

३५. जेथे 'एनएएलएसए' चा संबंध आहे, तेथे एनएएलएसए ने विधी सेवा वकिलांसाठी आणि परिवीक्षा अधिकाऱ्यांसाठी प्रशिक्षण संचाची प्रत अभिलेखावर सादर केली, परंतु एनएएलएसए च्या वतीने उपस्थित विद्वान वरिष्ठ वकिलांनी अशी सूचना केली की, बाल न्याय (मुलांची काळजी व संरक्षण) नियम, २००७ च्या आधारे संच तयार करण्यात आले असल्याने, त्यांची परिणामकारकता तपासण्यासाठी आणि नंतर त्यांना जेजे अधिनियमाअंतर्गत तयार करण्यात येणाऱ्या नवीन नियमांच्या धर्तीवर आणण्यासाठी, एनएएलएसए ने काही प्रायोगिक प्रशिक्षण कार्यक्रम आयोजित करावेत.

३६. दिनांक २२ ऑगस्ट, २०१६ रोजीच्या सुनावणीमध्ये, केंद्र सरकारकडे, बाल न्याय मंडळांना आणि बाल कल्याण समित्यांना तातडीने संगणक आणि इंटरनेट जोडणी पुरवण्याची शक्यता (सुसाध्यता) विचारात घेण्याची मागणी करण्यात आली.

३७. दिनांक १७ फेब्रुवारी, २०१७ रोजी प्रकरण पुन्हा सुनावणीसाठी घेण्यात आले आणि

तोवर एमडब्ल्यूसीडी ने ऑनलाईन पद्धतीने माहिती गोळा करण्यात बरीच प्रगती केली होती, जसे की, केंद्रीय स्तरावर देखरेखीचा नमुना तयार केला होता, ज्यामध्ये राज्य शासनांना आणि केंद्रशासित प्रदेशांना पूर्ण माहिती भरणे सोपे जाईल, जी पडताळता येऊ शकते.

३८. पडताळलेल्या माहिती सोबतच, प्रत्येक राज्यात आणि केंद्रशासित प्रदेशात राज्य बाल हक्क संरक्षण आयोग (एससीपीसीआर) असणे सुद्धा आम्हाला आवश्यक वाटले. असे नमूद करता येईल की, बाल हक्क संरक्षण आयोग अधिनियम, २००५ अंतर्गत, सदर अधिनियमाच्या कलम १३ मध्ये तपशीलवार नमूद केलेली विविध कार्ये करण्यासाठी एससीपीसीआर ही संस्था स्थापन करण्यात आली आहे.

३९. दिनांक ५ एप्रिल, २०१७ आणि दिनांक ११ जुलै, २०१७ रोजी एससीपीसीआर च्या रचनेबाबत आणि स्थापनेबाबत उपलब्ध असलेल्या माहितीची आम्ही नोंद घेतली आणि प्रकरणाचे सर्वंकष अवलोकन केल्यानंतर असे आढळून आले की, मोठ्या प्रमाणात रिक्त पदे अस्तित्वात होती आणि ती पदे भरण्यासाठी किंवा बाल हक्कांच्या संरक्षणाबाबत कोणतीही निकड दर्शविण्यासाठी काही राज्य शासनांनी थोडे किंबहुना काहीच प्रयत्न केले नाहीत.

४०. त्यानंतर दिनांक १५ नोव्हेंबर, २०१७ रोजी आम्ही महिला व बालकल्याण मंत्रालयाला प्रत्येक राज्यातील आणि केंद्रशासित प्रदेशातील बाल न्याय निधीमध्ये असलेल्या

रकमेची माहिती देण्यास सांगितले.

४१. ही सर्व माहिती कोणत्या ना कोणत्या स्वरूपात अभिलेखावर उपलब्ध झाल्यावर, आम्ही दिनांक २० नोव्हेंबर, २०१७ रोजी पक्षकारांच्या विद्वान वकिलांची निवेदने ऐकून घेतली आणि न्यायनिर्णय राखून ठेवला.

४२. मुलांना भेडसावणाऱ्या अडचणींची विविध परिमाणे आणि बऱ्याच राज्य शासनांनी आणि केंद्रशासित प्रदेशांनी बाल हक्कांबाबत दाखविलेला निष्काळजी दृष्टिकोन ठळकपणे निदर्शनास आणण्यासाठीच, जनहित याचिका दाखल झाल्यापासून सदर प्रकरणात झालेल्या काही अधिक महत्त्वाच्या कार्यवाहींमध्ये आम्ही तपशीलवार लक्ष घातले. बालकेसुद्धा प्रतिष्ठेची वागणूक मिळण्यास पात्र आहेत हे विसरणे सोपे आहे आणि केवळ त्यांना राज्याच्या कारभारात मत व्यक्त करण्याचा अधिकार नाही याचा अर्थ असा नाही की, ते समाजातील अपरिणामकारक घटक आहेत, ज्यांना गैरसोयीच्या स्थितीत राहण्यास भाग पाडता येईल (कमीत कमी सांगायचे झाले तर) आणि ज्यांना न्याय मिळविण्याचा कमी किंबहुना अजिबातच मार्ग उपलब्ध नाही.

एमडब्ल्यूसीडी ने दाखल केलेली शपथपत्रे

४३. प्रकरणाच्या प्रगतीदरम्यान, एमडब्ल्यूसीडी ने स्थितीदर्शक अहवाल आणि शपथपत्रे दाखल केली.

४४. दिनांक ३१ जुलै, २०१५ रोजी दाखल केलेल्या शपथपत्रामध्ये एमडब्ल्यूसीडी अंमलात आणत असलेल्या ऑनलाइन केंद्रीय स्तरावरील देखरेख यंत्रणेची स्थिती दर्शवण्यात आली होती. थोडक्यात, नमुने प्राप्त करण्यासाठी, माहिती भरण्यासाठी आणि एमडब्ल्यूसीडी ला अहवाल सादर करण्यासाठी प्रत्येक राज्यास आणि केंद्रशासित प्रदेशास एक लॉग इन आयडी आणि पासवर्ड देण्यात आला होता. अत्यंत स्थूलमानाने, अहवालामध्ये अंतर्भूत करण्यात आलेली क्षेत्रे म्हणजे गृहे आणि मुले, खुले निवारे, विशेष दत्तक विधान अभिकरणे, बिगर काळजीवाहू संस्था, बाल कल्याण समित्या, बाल न्याय मंडळे आणि सेवा पुरवणाऱ्या यंत्रणा. हे अतिशय दूरगामी पाऊल आहे आणि माहिती गोळा करण्याचा मुख्य प्रयत्न आहे, जेणेकरून जेजे अधिनियमाची परिणामकारक अंमलबजावणी करणे शक्य होईल आणि नियोजन प्रक्रिया तात्पुरती राहण्याऐवजी अधिक रचनात्मक होऊ शकेल.

४५. दिनांक ८ सप्टेंबर, २०१५ रोजी एमडब्ल्यूसीडी ने आणखी एक शपथपत्र दाखल केले, ज्यात असे दर्शविण्यात आले की, केंद्रीय स्तरावरील देखरेख यंत्रणेमध्ये आवश्यक असल्यानुसार सॉफ्टवेअरमध्ये माहिती भरण्याची आवश्यकता पूर्ण करण्यासाठी राज्य शासनांना आणि केंद्रशासित प्रदेशांना विनंती करण्यात आली होती. शपथपत्रामध्ये पूर्ततेच्या व्याप्तीबाबत निर्देश करण्यात आला होता. सन २०१४-२०१५ या कालावधीकरिता असे

नमूद करण्यात आले होते की, जरी बऱ्याच राज्य शासनांनी आणि केंद्रशासित प्रदेशांनी आवश्यक माहिती पुरविली होती, तरी जवळपास ७ राज्यांनी पूर्णपणे पूर्तता केली नव्हती. सन २०१५-२०१६ या कालावधीकरिता जवळपास सर्व राज्यांनी आवश्यक माहिती पुरविली नव्हती. आसाम, चंदिगढ केंद्रशासित प्रदेश, छत्तीसगढ, हिमाचल प्रदेश, मध्य प्रदेश, मेघालय, मिझोराम, नागालँड, पंजाब, तामिळनाडू आणि त्रिपुरा या राज्यांनी माहिती दिली होती.

४६. दिनांक ४ डिसेंबर, २०१५ रोजी एमडब्ल्यूसीडी ने स्थितीदर्शक अहवाल सादर केला, ज्यात राज्यांतील आणि केंद्रशासित प्रदेशांतील मुलांच्या काळजीवाहू संस्था आणि त्यांची नोंदणी, तसेच परिवीक्षा अधिकाऱ्यांची उपलब्धता यांचे तपशील नमूद केले होते. दुर्दैवाने, शपथपत्रानुसार स्थिती पूर्णपणे असमाधानकारक होती, कारण मुलांच्या अनेक काळजीवाहू संस्थांची नोंदणी करण्यात आली नव्हती आणि परिवीक्षा अधिकाऱ्यांची संख्या खूपच कमी होती. दिनांक १२ फेब्रुवारी, २०१६ रोजीच्या पुढील शपथपत्रात एमडब्ल्यूसीडी ने असे नमूद केले की, मुलांच्या काळजीवाहू संस्थांच्या नोंदणीसाठी पावले उचलण्यात आली होती आणि गोष्टींच्या योजनेमध्ये परिवीक्षा अधिकाऱ्यांची भूमिकासुद्धा त्यात नमूद करण्यात आली होती.

४७. दिनांक २९ मार्च, २०१६ रोजी एमडब्ल्यूसीडी ने दाखल केलेल्या अजून एक शपथपत्रामध्ये या न्यायालयाने दिनांक १५ फेब्रुवारी, २०१५ रोजी निश्चित केलेल्या १५ मुद्द्यांसंदर्भात वस्तुस्थितिदर्शक उत्तर दिले.

४८. दिनांक ३ मे, २०१६ रोजी एमडब्ल्यूसीडी ने अंतिम स्थितीदर्शक अहवाल सादर केला,

ज्यामध्ये असे नमूद करण्यात आले होते की, या न्यायालयाने निश्चित केलेल्या १५ मुद्द्यांच्या दृष्टिकोनातून केंद्रीय स्तरावरील देखरेख यंत्रणेमध्ये दिलेल्या माहितीसाठी काही नमुने समाविष्ट करण्यात आले होते.

४९. दिनांक ११ जानेवारी, २०१७ रोजीच्या शपथपत्रामध्ये, एमडब्ल्यूसीडी ने असे उघड केले की, बाल न्याय मुद्द्यांसाठी संगणक आणि त्यासंबंधीच्या इतर उपकरणांची उपलब्धता आणि वापर अत्यंत कमी होता. प्रत्यक्षात, राज्य शासनांनी आणि केंद्र शासित प्रदेशांनी या संदर्भातील पूर्ण माहिती एमडब्ल्यूसीडी ला उपलब्ध करून दिली नव्हती.

५०. एमडब्ल्यूसीडी ने दाखल केलेल्या अंतिम शपथपत्रामध्ये असे उघड करण्यात आले होते की, दिनांक २६ सप्टेंबर, २०१७ रोजी राष्ट्रीय सल्लामसलतीची बैठक आयोजित करण्यात आली होती आणि शपथपत्राचे वचन केल्यावर असे दिसते की, सहभागी असलेल्या व्यक्तींनी बाल हक्क आणि बाल न्याय मुद्दे समजून घेण्याच्या बाबतीत बरीच सुधारणा झालेली आहे, परंतु अजूनही खूप काही करायचे आहे. दुर्दैवाने, राष्ट्रीय सल्लामसलतीच्या बैठकीचे इतिवृत्त अभिलेखावर सादर करण्यात आलेले नाही.

५१. जोवर एनएएलएसएचा संबंध आहे, त्यांनी उल्लेखनीय अभ्यास करून २००० च्या कायद्यानुसार बाल न्याय मंडळे, बालकल्याण समित्या आणि गृहे यांच्याशी संबंधित विषयांवर तीन भागातील अहवाल अभिलेखावर ठेवला होता. जरी, एनएएलएसए तयार केलेले अहवाल अत्यंत उपयुक्त असले तरी, ते मागच्या तारखेचे असल्याने (ऑगस्ट २०११ पर्यंतच्या माहितीसह) त्याचा संदर्भ तपशिलवाररीत्या देण्यात येत नाही.

५२. दिनांक २० जुलै, २०१५ रोजी एनएएलएसए ने आणखी एक अहवाल सादर केला ज्यामध्ये, बाल न्याय मंडळे यांचेसमोर मोठ्या प्रमाणात चौकश्या प्रलंबित आहेत, असे निदर्शनास आणून देण्यात आले. पुढे, असे निदर्शनास आणूण देण्यात आले की, एकट्या उत्तरप्रदेश मध्ये ३४,५६९ चौकश्या तर छत्तीसगड मधील दुर्ग राज्यात १८८३ चौकश्या या बाल न्याय मंडळे यांचेसमोर प्रलंबित आहेत. त्या अहवालामध्ये असे निदर्शनास आणूण देण्यात आले आहे की, बाल न्याय मंडळे यांपैकी अनेकजण तर नियमितपणे सुनावणी घेत नाही तर, काही जण आठवड्यातून एकदा किंवा दोनदा सुनावणी घेतात. पुढे असेही निदर्शनास आणून देण्यात आले आहे की, काही ठिकाणी निरीक्षण गृह आणि बाल न्याय मंडळ यांच्यातील अंतर हे पुष्कळ आहे. पुढे, परिवीक्षा अधिकारी जे केवळ बाल न्याय समस्या यांसारख्या प्रकरणांबाबत कार्यवाही करू शकतील, अश्या अधिकाऱ्यांची गरज असल्याचे सादर करण्यात आले होते.

५३. या टप्प्यावर, हे नमूद केले जाऊ शकते की, मे २०१६ मध्ये एनएएलएसए द्वारे परिवीक्षा अधिकाऱ्यांसाठी एक प्रशिक्षण मॉड्यूल (नियामक) आणले गेले. हे प्रशिक्षण मॉड्यूल (नियामक) एनएएलएसए द्वारे वापरण्यात वापरण्यात आले आहे आणि आमची अशी समजूत करून दिली आहे की, ते प्रशिक्षण मार्गदर्शक म्हणून अत्यंत उपयुक्त आणि फायदेशीर असल्याचे निदर्शनास आले आहे.

याचिकाकर्तीतर्फे सादर केलेली निवेदने -

५४. याचिकाकर्तीने स्वतःच्या वतीने, मुलांच्या काळजीवाहू संस्थांमधील मुलांचे जीवन

सुधारण्यासाठी आणि त्यांना सन्मानाने जगण्यास सक्षम करण्यासाठी आवश्यक असलेल्या उपाययोजना मोठ्या प्रमाणावर सादर केल्या. याचिकाकर्तीने दिनांक १० आणि २५ सप्टेंबर, २०१३ रोजी आणि १० मे, २०१६ रोजी बाल हक्क आणि बाल न्यायाच्या विविध पैलूंवर सूचना देखील दिला होत्या. यातील बहुतांश सूचना ह्या एनएएलएसए ने दिलेल्या सूचनांना संपूरक आहेत.

चर्चा, सूचना आणि शिफारशी -

(i) राष्ट्रीय व राज्य बाल हक्क संरक्षण आयोग

५५. संसदेने अधिनियमित केलेल्या बालसंबंधित कायद्यांमध्ये एनसीपीसीआर आणि एससीपीसीआर ह्या दोन बाल आणि बालक हक्कांच्या संदर्भात अत्यंत महत्त्वाच्या धोरण तयार करणाऱ्या आणि निर्णय घेणाऱ्या संस्थांची तरतूद आहे. त्याचप्रमाणे, तळागाळाच्या स्तरावर बाल न्याय कायद्याच्या अंमलबजावणीसाठी राज्य बाल संरक्षण संस्था आणि जिल्हा बाल संरक्षण पथक या दोन अत्यंत महत्वाच्या संस्था यांची तरतूद करण्यात आली आहे. आमच्या मते, जर या संस्थांनी संबंधित राज्य सरकार आणि भारत सरकार यांच्या देखरेखीखाली आणि मार्गदर्शनाखाली संसदेने तयार केलेल्या आवश्यक कायद्यानुसार त्यांची कर्तव्ये पार पाडली तर बाल हक्कांना मान्यता आणि त्यांची अंमलबजावणी खऱ्या अर्थाने आपल्या देशात येऊ शकते.

५६. बाल हक्क संरक्षण आयोग अधिनियम, २००५ मध्ये केंद्र सरकारने राष्ट्रीय स्तरावर एनसीपीसीआर म्हणून ओळखली जाणारी संस्था आणि राज्य सरकारने राज्य स्तरावर

एससीपीसीआर म्हणून ओळखली जाणारी संस्था स्थापन करण्याची तरतूद आहे. एनसीपीसीआर च्या रचनेबाबत कायद्याच्या कलम ३ मध्ये तरतूद करण्यात आली आहे तर एससीपीसीआर च्या रचनेबाबत कायद्याच्या कलम १७ मध्ये तरतूद करण्यात आली आहे. राष्ट्रीय बाल हक्क संरक्षण आयोगाचे कलम ३ हे पुढीलप्रमाणे वाचावे :

"३. बालहक्क संरक्षणासाठी राष्ट्रीय बाल हक्क संरक्षण आयोग घटित करणे -

(१) केंद्र सरकार, अधिसूचनेद्वारे, "राष्ट्रीय बाल हक्क संरक्षण आयोग" या नावाने ओळखण्यात येणारा एक निकाय या अधिनियमान्वये त्याला प्रदान करण्यात आलेल्या अधिकाऱ्यांचा वापर व नेमून देण्यात आलेली कर्तव्ये पार पाडण्यासाठी घटित करेल.

(२) हा आयोग पुढील सदस्यांचा मिळून बनलेला असेल :-

(क) अध्यक्ष, जी विख्यात व्यक्ती असेल आणि जिने बालकल्याणाला चालना देण्यासाठी लक्षणीय कार्य केलेले असेल ; आणि

(ख) केंद्र सरकारने, -

(एक) शिक्षण ;

(दोन) बालकांचे आरोग्य, त्यांची देखभाल, कल्याण किंवा बालविकास ;

(तीन) बाल न्याय किंवा दुर्लक्षित वा उपेक्षित (मर्जिनलाईज्ड) बालकांची किंवा विकलांग बालकांची देखभाल ;

(चार) बालमजुरी निर्मूलन किंवा आपदग्रस्त बालके

(पाच) बाल मानसशास्त्र किंवा समाजशास्त्र ; आणि

(सहा) बालकांसंबंधीचे कायदे ;

या क्षेत्रांतील प्रभुत्व क्षमता, प्रतिष्ठा आणि अनुभव असलेल्या व्यक्तींमधून, नियुक्त करावयाचे सहा सदस्य, ज्यांपैकी किमान दोन सदस्य ह्या महिला असतील.

(३) आयोगाचे कार्यालय दिल्ली येथे असेल."

५७. हे अगदी स्पष्ट आहे की, राष्ट्रीय स्तरावर एनसीपीसीआर ही आपापल्या क्षेत्रातील मान्यवर व्यक्ती आणि तज्ज्ञांचा समावेश असलेली संस्था आहे. त्यामुळे त्यांनी प्रत्येक एससीपीसीआर आणि इतर हितसंबंधित व्यक्ती यांची मते विचारात घेऊन राष्ट्रीय परिप्रेक्ष्यात मुलांच्या कल्याणाशी संबंधित मुद्द्यांकडे पाहणे अपेक्षित आहे. राज्य स्तरावर एससीपीसीआर ही तितकीच महत्त्वाची संस्था आहे, ज्यात मान्यवर व्यक्ती आणि तज्ज्ञांचा समावेश आहे. त्यांनी आपल्या राज्यातील मुलांच्या हितासाठी धोरणात्मक निर्णय घेणे अपेक्षित आहे, मग ती मुले मूळ कोणत्याही राज्याची असोत, कारण काळजी आणि संरक्षणाची आवश्यकता असलेल्या एका राज्याची मुले असू शकतात, पण दुसऱ्या राज्याच्या मुलांच्या काळजीवाहू संस्थेत.

५८. एनसीपीसीआर आणि एससीपीसीआर यांची कार्ये कमी अधिक प्रमाणात समान आहेत. अपवाद वगळता, एक राष्ट्रीय स्तरावर ही कार्ये करतो तर दुसरा राज्य स्तरावर ही कार्ये करतो. बाल हक्क संरक्षण आयोग अधिनियम, २००५ च्या कलम १३ मध्ये एनसीपीसीआरच्या

कार्यांचा तपशील देण्यात आला आहे. सदर कार्ये ही पुढीलप्रमाणे वाचावी :

" **१३. आयोगाची कार्ये -** (१) आयोग, पुढील सर्व किंवा त्यांपैकी कोणतीही कार्ये पार पाडील :-

(क) बाल हक्कांच्या संरक्षणाकरिता त्या त्या वेळी अंमलात असलेल्या कोणत्याही कायद्याद्वारे किंवा तदन्वये तरदूत केलेल्या संरक्षण उपाययोजनांची तपासणी करणे व त्यांचा आढावा घेणे आणि त्यांची परिणामकारक अंमलबजावणी करण्यासाठी उपाययोजनांची शिफारस करणे ;

(ख) आयोगाच्या संरक्षक उपाययोजनांच्या अंमलबजावणी बाबतचे अहवाल केंद्र सरकारकडे दरवर्षी आणि आयोगास योग्य वाटेल अशा अन्य कालांतराने सादर करणे ;

(ग) बाल हक्कांचे उल्लंघन झाल्याच्या प्रकरणांची चौकशी करणे व अशा प्रकरणांत कार्यवाही सुरू करण्याची शिफारस करणे ;

(घ) दहशतवाद, जातीय हिंसाचार, दंगली, नैसर्गिक आपत्ती, कौटुंबिक हिंसाचार, एच.आय.व्ही/ एड्स, अपव्यापार, वाईट वागणूक, छळ व पिळवणूक, संभोगचित्रण आणि शरीरविक्रीय यांनी बाधित झालेल्या बालकांना त्यांच्या हक्कांचा उपभोग घेण्यास आडकाठी आणणाऱ्या सर्व घटकांची तपासणी करणे व योग्य त्या सुधारात्मक

उपाययोजनांची शिफारस करणे ;

(ड) विशेष देखभालीची व संरक्षणाची गरज असलेल्या बालकांच्या तसेच आपदग्रस्त बालके, उपेक्षित आणि वंचित बालके, कायद्याच्या संघर्षात अडकलेली बालके, बाल गुन्हेगार, कुटुंबहीन बालके व कैद्यांची बालके यांच्या संबंधातील बाबींमध्ये लक्ष घालणे व योग्य त्या सुधारात्मक उपाययोजनांची शिफारस करणे ;

(च) करार व इतर आंतरराष्ट्रीय संलेख यांचा अभ्यास करणे आणि बाल हक्कांवरील विद्यमान धोरणे, कार्यक्रम व इतर उपक्रम यांचा नियतकालिक आढावा घेणे आणि बालकांसाठी सर्वाधिक हितकारक होईल अशा रीतीने त्यांची परिणामकारक अंमलबजावणी करण्यासाठी शिफारस करणे ;

(छ) बाल हक्कांच्या क्षेत्रात संशोधन कार्य हाती घेणे व त्याला चालना देणे ;

(ज) समाजाच्या निरनिराळ्या वर्गांत बाल हक्कांबाबतची जाणीव निर्माण करणे आणि या हक्कांच्या संरक्षणासाठी उपलब्ध असलेल्या संरक्षक उपाययोजनांबाबत प्रकाशने, प्रसारमाध्यमे, चर्चासत्रे व इतर उपलब्ध साधने यांच्याद्वारे जागृती घडवून आणणे ;

(झ) जेथे बालकांना उपचार, सुधारणा किंवा संरक्षण या

प्रयोजनाकरिता ठेवण्यात आले असेल असे कोणतेही बालक अभिरक्षागृह किंवा सामाजिक संघटनेद्वारे चालविण्यात येणाऱ्या कोणत्याही संस्थेसह, केंद्र सरकार किंवा कोणतेही राज्य शासन किंवा कोणतेही इतर प्राधिकरण यांचा नियंत्रणाखालील बालकांसाठी असलेली कोणतीही इतर निवासाची जागा किंवा संस्था यांचे निरीक्षण करणे किंवा करावयास लावणे आणि आवश्यकता वाटल्यास, या प्राधिकरणांमार्फत सुधारात्मक कृती करवून घेणे ;

(ञ) पुढील बाबींशी संबंधित तक्रारींची चौकशी करणे आणि त्यांची स्वाधिकारे दखल घेणे -

(एक) बाल हक्कांपासून वंचित ठेवणे व त्यांचे उल्लंघन करणे ;

(दोन) बालकांचे संरक्षण व विकास यांबद्दलची तरतूद असलेल्या कायद्यांची अंमलबजावणी न करणे ;

(तीन) बालकांच्या हालअपेष्टांची तीव्रता कमी करणे व त्यांच्या कल्याणाची सुनिश्चिती करणे, हा उद्देश असलेले धोरणात्मक निर्णय, मार्गदर्शक तत्वे किंवा सूचना यांचे अनुपालन न करणे आणि अशा मुलांना सहाय्य करणे,

किंवा अशा बाबींमधून उद्भवलेल्या समस्या समुचित प्राधिकरणांच्या मार्फत सोडविणे.

(ट) बाल हक्कांना चालना देण्याकरिता आवश्यक वाटतील अशी इतर कार्ये व वरील कार्यांना आनुषंगिक अशी इतर कोणतीही बाब.

(२) राज्य आयोगासमोर किंवा त्या त्या अंमलात असलेल्या कोणत्याही कायद्यान्वये योग्य रीतीने घटित करण्यात आलेल्या इतर कोणत्याही आयोगासमोर प्रलंबित असलेल्या कोणत्याही प्रकरणाची चौकशी, आयोग करणार नाही."

५९. वर नमूद केल्यावरून असे लक्षात येईल की, एनसीपीसीआर आणि एससीपीसीआर या दोन्हींना करावयाची वेगवेगळ्या आवाक्यातील आणि विविध कार्ये आहेत आणि त्यातील प्रत्येक कार्य जबाबदारी पार पाडण्यासाठी भाग पाडत. आमची अशी समजूत करून दिली आहे की, भारत सरकारन आणि राज्य सरकार या दोघांनीही या संस्थांना व्यापक धोरणात्मक बाबींवर निर्णय घेण्याचे स्वातंत्र्य दिलेले नाही आणि खरेतर काही प्रकरणांमध्ये, विशेषतः एससीपीसीआरशी संबंधित प्रकरणांमध्ये, अनेक महिन्यांपासून रिक्त पदे भरली गेली नाहीत. वस्तुतः, एससीपीसीआरच्या[4] सदस्यांची रिक्त पदे भरण्यासाठी पंजाब आणि हरयाणा आणि चंदिगडच्या केंद्रशासित प्रदेश या राज्य सरकारला परमादेश मिळावा यासाठी एनसीपीसीआरला पंजाब आणि हरयाणा उच्च न्यायालयात रिट याचिका दाखल करणे भाग पडले होते. दुर्दैवाने, एकेकाळी या न्यायालयाने हे पद भरण्याचे निर्देश देईपर्यंत एनसीपीसीआरच्या कार्याध्यक्षाचे पद देखील अनेक महिन्यांपर्यंत हे रिक्तच होते. आम्ही

4 स्वतंत्र स्वाधिकारे दखल घेतलेले प्रकरण वि. पंजाब राज्य आणि राष्ट्रीय बाल हक्क संरक्षण आयोग (एनसीपीसीआर) वि. हरयाणा राज्य आणि इतर, निकालाची तारीख ०९.०४.२०१३ आणि मनू/पीएच/०५९९/२०१३ म्हणून प्रकाशित

क्वचितच असे म्हणू शकतो की, जोपर्यंत एनसीपीसीआर आणि एससीपीसीआरला भारत सरकार आणि राज्य सरकार यांकडून योग्य महत्व दिले जात नाही आणि रिक्त पदे वेळेत भरली जात नाहीत, तोपर्यंत मुलांच्या हक्कांची अंमलबजावणी ही रखडत राहिल आणि भारत सरकारने किंवा राज्य सरकार यांनी तयार केलेल्या अनेक कल्याणकारी योजना या अंमलबजावणी न करताच राहतील किंवा त्यांची अंमलबजावणी ही केवळ रुपरेषेच्या स्वरूपाची आणि प्रतीकात्मक राहील.

६०. आम्हाला अशी आशा आणि विश्वास आहे की, भारत सरकार आणि राज्य सरकार यामध्ये अधिकार आणि सत्तेत असलेल्या लोकांना संसदेने अधिनियमित केलेल्या कायद्यांच्या तरतुदींचे पालन करण्याचे महत्त्व कळेल आणि राष्ट्रीय स्तरावर एनसीपीसीआर आणि राज्य स्तरावर एससीपीसीआर प्रत्यक्षात कार्य करतील आणि त्यांची कर्तव्ये पार पडतील आणि त्यांच्या जबाबदाऱ्या ओळखतील, याची सुनिश्चिती करतील.

(ii) राज्य बाल संरक्षण संस्था आणि जिल्हा बाल संरक्षण पथक -

६१. या दोन्ही संस्थांवर कोणाची नेमणूक करावी, याबाबत कोणतीही सुस्पष्ट मार्गदर्शक तत्वे नसताना राज्य सरकार यांनी केवळ सरकारी अधिकारी यांची नेमणूक केली आणि नागरी समाजातील सदस्यांना वगळून सोपा मार्ग शोधला आहे. आमच्या मते, राज्य बाल संरक्षण संस्था आणि जिल्हा बाल संरक्षण पथक यांच्या स्थापनेचा गांभीर्याने विचार करण्याची गरज आहे, जेणेकरून पोलीस आणि एन.जी.ओ यांच्यासह सर्व हितसंबंधित व्यक्ती हे या दोन्ही संस्थांची कार्ये, कर्तव्ये आणि जबाबदाऱ्या पार पाडण्यात सक्रिय सहभाग घेतात.

६२. राज्य बाल संरक्षण संस्था आणि जिल्हा बाल संरक्षण पथक यांची कार्ये ही भारत सरकारने तयार केलेल्या बाल न्याय (मुलांची काळजी व संरक्षण) अधिनियम, आदर्श नियम २०१६ च्या नियम ८४ आणि ८५ मध्ये तपशीलवार आहेत. [हे लक्षात घेतले पाहिजे की, काही राज्यांनी त्यांचे स्वतंत्र असे नियम तयार केलेले आहेत, परंतु, आम्ही त्यांचा संदर्भ देत नाही] ही कार्ये वैविध्यपूर्ण, व्यापक आणि विविध रणनितांद्वारे आणि सर्व हितसंबंधित व्यक्तींच्या सहभागासह मुलांचे राहणीमान सुधारण्यासाठी गतिमान आहेत.

६३. बाल न्याय कायदा आणि एनसीपीसीआर आणि एससीपीसीआरने निर्धारित केलेल्या बाल न्याय कायदा आणि धोरणांच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी बाल न्याय कायद्याच्या कलम १०६ मध्ये राज्यस्तरीय बाल संरक्षण संस्था आणि जिल्हास्तरीय बाल संरक्षण पथक स्थापन करण्याची तरतूद आहे. बाल न्याय कायद्याचे कलम १०६ हे खालीलप्रमाणे वाचावे :-

> **“१०६. राज्य बाल संरक्षण संस्था आणि जिल्हा बाल संरक्षण पथक -** प्रत्येक राज्य शासन राज्यासाठी एक बाल संरक्षण संस्था आणि प्रत्येक जिल्ह्यासाठी बाल संरक्षण केंद्र स्थापन करील. सदर संस्था किंवा केंद्रात आवश्यक ते अधिकारी आणि कर्मचारी नेमले जातील. बालकांसंबंधी सर्व प्रकरणे या अधिनियमाच्या अंमलबजावणीच्या अनुषंगाने हाताळली जातील. त्यामध्ये या अधिनियमाखाली संस्था निर्माण करणे व चालविणे, बालके त्याचे पुनर्वसन व शासकीय आणि बिन शासकीय संस्थांमध्ये समन्वयाकरिता अधिसूचना काढून सक्षम अधिकाऱ्यांची पदे निर्माण केली जातील.”

६४. वरील तरतुदीचे अवलोकन केल्यास व्यापकपणे असे दिसून येते की, राज्य बाल संरक्षण संस्था आणि जिल्हा बाल संरक्षण संस्था यांचे प्राथमिक कार्य हे बाल न्याय कायद्याच्या अंमलबजावणीची सुनिश्चिती करणे हे आहे. तसेच, या संस्थांची बाल न्याय कायद्यांतर्गत संस्था ही प्रस्थापित झालेल्या आहेत आणि त्यांचे कामकाज सुस्थितीत चालू आहे तसेच मुले आणि त्यांचे पुनर्वसन यांच्या संबंधातील सक्षम अधिकारी यांचे अस्तित्व आहे, याची सुनिश्चीती करणे आणि या दोन्ही संस्थांनी त्यांचे व्यापक आवाका असलेली कार्ये पार पाडण्यासाठी सरकारी अधिकारी तसेच एन.जी.ओ यांच्याशी समन्वय साधणे आवश्यक आहे. एन.जी.ओ. च्या माध्यमातून नागरी समाजाचा सहभाग हे एक पुरोगामी पाऊल आहे आणि या दोन्ही संस्थांनी वेळोवेळी त्यांचे सहाय्य घेणे अपेक्षित आहे.

६५. जर या दोन्ही संस्था त्यांच्याकडून अपेक्षित असलेल्या रीतीने खरोखरच त्यांची कर्तव्ये पार पाडली तर बाल न्याय कायद्याची अंमलबजावणी हा पुढे मुद्दाच राहणार नाही. दुर्दैवाने, आमची अशी समजूत करून दिली आहे की, या संस्था अनेक ठिकाणी किंवा ज्या रीतीने कार्यरत असणे अपेक्षित होते त्या पद्धतीने कार्यरत नाहीत आणि तसेच अनेक जिल्ह्यांमध्ये बाल संरक्षण पथकाची स्थापनाही झालेली नाही. सर्व संबंधितांकडून उपाययोजने संदर्भात पावले उचलण्यात यावीत, अशी आमची अपेक्षा आहे.

(iii) बाल न्याय मंडळे आणि बाल कल्याण समित्या -

६६. बाल न्याय मंडळे यांच्या स्थापनेच्या संदर्भात, आमची अशी समजूत करून दिली आहे की, बहुतेक जिल्ह्यांमध्ये आता बाल न्याय मंडळ आहे, परंतु, ही वेळ आली आहे की, प्रत्येक

राज्यातील प्रत्येक जिल्ह्यात बाल न्याय मंडळ असणे आवश्यक आहे. याला अपवाद असा असू शकतो, जसे की, अरुणाचल प्रदेशच्या काही जिल्ह्यांमध्ये जेथे कदाचित बाल गुन्हेगारी नाही किंवा काही जिल्हे असू शकतात जेथे चौकशीची संख्या फारच कमी आहे, अशा परिस्थितीत, बाल न्याय मंडळ आपल्या कामकाजाचे वेळापत्रक ठरवू शकते, त्याचप्रमाणे, जर तेथे काही लगतचे जिल्हे असतील जेथे प्रलंबित चौकश्यांची संख्या खूपच कमी असेल, तर तेथे 'परिक्रम बाल न्याय मंडळ' याचा विचार केला जाऊ शकतो.

६७. आमची अशी समजूत करून दिली आहे की, काही बाल न्याय मंडळाचे सदस्य म्हणून काही सामाजिक कार्यकर्त्यांची नियुक्ती ही बाल न्याय मंडळ कायद्याच्या कलम ४ मधील तरतुदींनुसार नाही आहे. या संदर्भातील संबंधित तरतुदी ह्या खालीलप्रमाणे वाचाव्यात -

> "४. बाल न्याय मंडळ :- १. xxx xxx xxx
>
> २. मंडळ हे ३ वर्षांचा अनुभव असलेला महानगर दंडाधिकारी किंवा यथास्थिती प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी (जेथे मुख्य महानगर दंडाधिकारी किंवा मुख्य न्यायदंडाधिकारी नसेल तेथे) (यापुढे यांचा उल्लेख प्रमुख दंडाधिकारी म्हणून केला जाईल) आणि दोन सामाजिक कार्यकर्ते, ज्यापैकी किमान एक सदस्य महिला असेल, यांचे मिळून यांचे मिळून बनलेले असेल आणि त्यांचे एक न्यायपीठ तयार होईल आणि अशाप्रकारे प्रत्येक न्यायपीठाकडे, फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ (१९७४ चा २) अन्वये महानगर दंडाधिकाऱ्याला किंवा यथास्थिती, प्रथम वर्ग न्यायदंडाधिकाऱ्याला प्रदान केलेले अधिकार असतील.

३. मंडळाचा सदस्य म्हणून नियुक्ती करण्यापूर्वी तो कोणताही सामाजिक कार्यकर्ता, मुलांच्या संबंधातील आरोग्य, शिक्षण किंवा कल्याण कार्यक्रम यामध्ये किमान सात वर्षे प्रत्यक्षपणे सक्रिय सहभागी व्यवसायी व्यक्ती असल्याखेरीज आणि त्याची बालमानसशास्त्र, मानसोपचार, समाजशास्त्र किंवा कायदा यामधील पदवी असल्याखेरीज त्याची मंडळाचा सदस्य म्हणून नियुक्ती केली जाणार नाही;

४. xxx xxx xxx

५. राज्य शासनाने मंडळाच्या प्रमुख न्यायदंडाधिकाऱ्यासह सर्व सदस्यांना त्यांची नेमणूक केलेल्या दिनांकापासून साठ दिवसांच्या आत त्यांना बालकांसाठी बालकांची काळजी, संरक्षण, पुनर्वसन, कायदेशीर तरतुदी आणि तदनुषंगाने विहित केलेल्या बालकांसाठी न्याय व्यवस्थादी सर्व गोष्टींचे पद्धतशीर प्रेरणा प्रशिक्षण व संवेदनशील करणे, हे सर्व केल्याचे सुनिश्चित करून घ्यावे.

६. आणि ७. xxx xxx xxx."

६८. बाल न्याय मंडळाचे सदस्य म्हणून सामाजिक कार्यकर्त्यांची निवड ही आदर्श नियमावलीच्या नियम ८७ सह नियम ८८ मधील तरतुदींनुसार करणे आवश्यक आहे. हे समजून घेतले पाहिजे की, सामाजिक कार्यकर्त्यांची नियुक्ती ही एक गंभीर बाब आहे, ज्याअर्थी ते बाल न्याय कायद्याअंतर्गत चौकशी करताना, त्यांचा व्यावहारिक आणि व्यावसायिक अनुभवाचा वापर करतात. जेव्हा, हे लक्षात घेतले जाते की, बाल न्याय

कायद्याच्या कलम ७ मध्ये नमूद केल्यानुसार सामाजिक कार्यकर्तेदेखील प्रमुख दंडाधिकारी यांचेप्रमाणेच स्वतंत्रपणे चौकशी करू शकतात, तेव्हा हे अधिक महत्त्वाचे ठरते. तथापि, बाल न्याय कायद्याच्या कलम ७ च्या पोटकलम (३) च्या परंतुकामधील तरतुदीनुसार, चौकशीचा अंतिम निकाल हा प्रमुख दंडाधिकारी यांच्या शिवाय असू शकत नाही. त्यामुळे सामाजिक कार्यकर्त्यांवर चौकशी दरम्यान आणि त्याच्या निकालादरम्यान सार्थ योगदान देण्याची मोठी जबाबदारी असते.

६९. या संदर्भात, हे लक्षात घेणे महत्त्वाचे आहे की, प्रमुख दंडाधिकारी तसेच सामाजिक कार्यकर्ते यांचे प्रशिक्षण हे अत्यंत महत्त्वाचे आहे आणि याबाबत आदर्श नियमावलीच्या नियम ८९ मध्ये तरतूद आहे. दुर्दैवाने, प्रशिक्षणाचा कालावधी आणि अभ्यासक्रम यांची मांडणी अद्याप केलेली नाही आणि प्रमुख दंडाधिकारी आणि सामाजिक कार्यकर्ते यांना देण्यात येणाऱ्या प्रशिक्षणाचे स्वरूप हे काहीसे अरचित आहे. अर्थपूर्ण आणि प्रभावी प्रशिक्षणाचा अभाव (आणि उजळणी पाठ्यक्रम) यांचा चौकशीच्या अंतिम निकालावर तसेच कायद्याशी संघर्ष करणाऱ्या बालकांचे जो बाल न्याय मंडळ यांचेसमोर आहे, अशा बालकांचे पुनर्वसन आणि पुर्नएकात्मीकरण यावर देखील महत्त्वपूर्ण आघात होऊ शकतो. केवळ कायदा आणि बाल हक्कांविषयी जागरूकता या दृष्टिकोनातूनच नव्हे तर बाल न्याय मंडळे यांचे संवेदीकरण, प्रकरण व्यवस्थापन आणि कायद्याशी संघर्ष करणारे बालक यांच्यासाठी बाल न्याय मंडळात बालकांसाठी सुलभ असेल अशी परिस्थिती आणि वातावरण निर्माण करणे, या दृष्टिकोनातूनही याचा गांभीर्याने विचार होणे आवश्यक आहे. आम्हाला असे दिसून आले आहे

की, बाल न्याय मंडळाच्या कामकाजाच्या या पैलूंचा फारसा विचार केलेला नाही आणि कदाचित म्हणूनच वर नमूद केल्याप्रमाणे खूप मोठ्या संख्येने चौकश्या ह्या प्रलंबित आहेत, ज्यात उत्तरप्रदेश हे राज्य या यादीत अग्रस्थानी आहे.

७०. बाल न्याय मंडळाच्या कामकाजाबद्दल, गुवाहाटी उच्च न्यायालयाच्या **नैसुल खातुन वि. आसाम राज्य व इतर**[5] मधील न्यायनिर्णयातील खालील नमूद परिच्छेदाचा संदर्भ घेणे योग्य ठरेल.

> “ या प्रकरणाची दुसरी अस्वस्थ करणारी बाब म्हणजे कायद्याच्या कलम ४ अन्वये स्थापन करण्यात आलेले बाल न्याय मंडळ यांनी प्रत्यक्षात सुनावणी घेतली नाही किंवा बालकांसंबंधीचे प्रकरण हाताळण्याकरिता एकत्र जमलेले नाहीत, असे दिसून येते. आम्ही असे म्हणतो कारण प्रकरणाच्या मूळ अभिलेखावरून आम्हाला असे आढळते की, बालकांना जामीन नाकारण्यासह या प्रकरणात पारित करण्यात आलेल्या सर्व आदेश पत्रांवर बाल न्याय मंडळाच्या प्रमुख दंडाधिकारी यांनीच स्वाक्षरी केली आहे. अल्पवयीन मुलाच्या वडिलांनी त्याला जामीन मंजूर करण्याच्या विनंतीवर विचार करण्यासाठी मंडळाचे दोन सामाजिक कार्यकर्ते कधीही एकत्र आले, असे म्हणण्यासारखे काहीही नाही. हे दुर्दैवी आहे कारण ज्ञानाचा वापर हा केवळ प्रमुख दंडाधिकारी यांच्याद्वारे नव्हे तर बाल न्याय मंडळ

---

5 २०११ फौ. एल. जे. ३२६ = २०१० एससीसी ऑनलाइन गौ २२५

यांच्याद्वारे असणे आवश्यक होते.”

७१. याचिकाकर्तीतर्फे उपस्थित विद्वान वकील तसेच एनएएलएसए तर्फे उपस्थित विद्वान वकील यांनी आमच्यासमोर सादर केलेली निवेदने असे सूचित करतात की, बाल न्याय मंडळे ही नियमितपणे सुनावणी घेत नाहीत. अर्थात, हे प्रत्येक बाल न्याय मंडळे यांचेसमोर किती चौकशी प्रकरणे प्रलंबित आहेत यावर अवलंबून असेल. परंतु, स्पष्टपणे, जर मोठ्या संख्येने चौकशी प्रलंबित असेल तर बाल न्याय कायद्यात विहित केलेल्या कालमर्यादेत ती चौकशी पूर्ण व्हावी यासाठी नियमितपणे सुनावणी घेणे हे बाल न्याय मंडळावर बंधनकारक आहे. एखादी चौकशी दीर्घकाळ प्रलंबित राहिली तर त्याचा काहीही हेतू साध्य होत नाही. चौकशीचा निकाल लागण्यास उशीर झाल्यास त्याचा कोणालाही फायदा होत नाही. या संदर्भात, आम्ही या गोष्टीची देखील घालू शकतो की, जेथे मोठ्या प्रमाणावर चौकशा प्रलंबित आहेत, तेथे राज्य सरकार आणि उच्च न्यायालयाने एकापेक्षा अधिक बाल न्याय मंडळ असण्याचा विचार करणे योग्य ठरेल. उदाहरणार्थ, दिल्लीमध्ये कोणत्याही वेळी जास्तीत जास्त तीन बाल न्याय मंडळे कार्यरत असतात आणि त्याचे कारण हे मोठ्या संख्येने प्रलंबित असलेल्या चौकश्या हे आहे. एका जिल्ह्यात एकापेक्षा अधिक बाल न्याय मंडळ स्थापन होण्याचा आवश्यकतेचे मूल्यमापन आणि पडताळणी केल्यानंतर, इतर काही राज्य सरकारे तसेच उच्च न्यायालये देखील अशीच पावले उचलू शकतात.

७२. सुनावणी दरम्यान, आम्ही, राज्य सरकारद्वारे बाल न्याय मंडळे यांचेकडे पुरेसे कर्मचारी उपलब्ध आहेत का? याबाबत अभ्यास करण्याची आवश्यकता यावर भर दिला होता. दुर्दैवाने,

प्रतिसाद खूपच कमी होता आणि आम्हाला पुरेसे कर्मचारी उपलब्ध आहेत केवळ असे सांगण्यात आले होते. याचा विचार केला पाहिजे की, बाल न्याय मंडळ हे वस्तुतः न्यायालयाच्या स्वरूपात आहे, जरी ते खटला चालवीत नाही, परंतु केवळ चौकशी करतात. तरीही, त्यांची कार्ये कार्यक्षम रितीने पार पाडण्यासाठी पुरेश्या कर्मचाऱ्यांची आवश्यकता आहे. बाल न्याय मंडळे यांच्याकडे अनेक प्रशासकीय कार्ये देखील आहेत आणि त्याकडे लक्ष देणे आवश्यक आहे, जेणेकरून, बाल न्याय मंडळ. निरीक्षण गृहाचे अधिकारी, पोलीस, कायद्याशी संघर्ष करणारी मुले आणि सदर मुलांचे पालक आणि पोलिसांचे तसेच कायद्याशी संघर्ष करणारी मुले यांचे प्रतिनिधित्व करणारे वकील यांच्यामध्ये प्रभावी समन्वय राहील. जर बाल न्याय मंडळ यांना प्रभावीपणे कामकाज करावयाचे असेल तर, या प्रशासकीय कर्तव्यांकडे लक्ष देणे आवश्यक आहे आणि एक प्रासंगिक विधान की, बाल न्याय मंडळाकडे पुरेसे कर्मचारी आहेत शक्यतो अचूक असले तरी, बाल न्याय मंडळ समोर चौकशीला उपस्थित राहणाऱ्या हितसंबंधित व्यक्तींच्या गरजा लक्षात घेता, ते आहे पण आणि नाही पण.

७३. या संदर्भात, हे देखील नमूद करणे आवश्यक आहे की, कायद्याशी संघर्ष करणाऱ्या बालकांना सहाय्य करू शकतील, अशा चांगल्या दर्जाच्या विधी सेवा वकिलांची नितांत आवश्यकता आहे. हा मुद्दा राज्य विधी सेवा प्राधिकरणाणे गांभीर्याने घ्यायला हवा. जोपर्यंत, एखाद्या मुलाला पुरेशी कायदेशीर मदती दिली नाही तर, त्याचा परिणाम त्याच्या किंवा तिच्या भविष्यावर होऊ शकतो, विशेषतः जर कायदयाशी संघर्ष करणारा बालक दोषी आढळले आणि त्याला विशेष गृहात ठेवले गेले. आपल्या बाजूने, एनएएलएसएने विधी सेवा

वकिलांच्या प्रशिक्षणासाठी एक नियमपुस्तिका तयार केली आणि आम्हाला असा विश्वास आहे की, सर्वसाधारणपणे, ती केवळ कायद्याशी संघर्ष करणारे बालक यांच्या वतीने हजर असणाऱ्या विधी सेवा वकीलांसाठीच नव्हे तर विधी सेवा वकिलांसाठी देखील अत्यंत उपयुक्त असणार आहे. तसेच, अभियोग पक्षाला देखील याबाबत जागरूक करणे आवश्यक आहे आणि आम्हाला अशी आशा आहे की, बाल न्याय कायद्याचा मुख्य हेतू लक्षात घेऊन राज्य सरकारने त्यांना शिक्षण व प्रशिक्षण देण्याचा दृष्टीने आवश्यक पावले उचलतील. जो समाजात कायद्याशी संघर्ष करणाऱ्या बालकांचे पुनर्एकात्मीकरण आणि त्या बालकांचे पुनर्वसन करणे हा आहे.

७४. परिणामकारक रितीने चौकशी करण्याच्या संदर्भात परिविक्षा अधिकारी यांची भूमिका कमी लेखू शकत नाही किंवा परिवीक्षा अधिकारी यांनी तयार केलेल्या अचूक सामाजिक अन्वेषण अहवालाचे महत्वही दुर्लक्ष करू शकत नाही. परिवीक्षा अधिकारी यांची कर्तव्ये ही आदर्श नियमावलीच्या नियम क्रमांक ६४ मध्ये तपशीलवार सांगितली आहेत आणि ती खालीलप्रमाणे वाचावी :-

“६४. परिवीक्षा अधिकारी यांची कर्तव्ये :-

(१) अधिनियमाच्या कलम १३ च्या पोटकलम (१) च्या खंड (ii) अन्वये पोलीस किंवा बालकल्याण पोलीस अधिकाऱ्याकडून माहिती प्राप्त झाल्यानंतर, कोणत्याही औपचारिक आदेशाची वाट न पाहता, परिवीक्षा अधिकारी हे बालकाच्या परिस्थितीबाबत चौकशी करतील, ज्याचा मंडळाकडून केल्या

जाणाऱ्या चौकशीवर प्रभाव असू शकेल आणि नमुना ६ मध्ये सामाजिक अन्वेषण अहवाल मंडळास सादर करतील.

(२) सामाजिक अन्वेषण अहवालामध्ये जोखीम मूल्यमापनाची तरतूद असावी, ज्यामध्ये बिघडवणारे आणि त्याचा परिणाम कमी करणारे घटक ज्यामुळे परिस्थिती जसे की, शेजारी राहणारे अपव्यापार करणारे किंवा शिवीगाळ करणारे, प्रौढ टोळ्या, अंमली पदार्थ सेवन करणारे, शस्त्रास्त्रे आणि अंमली पदार्थ बाळगणारे, अयोग्य वर्तणूक, माहिती आणि साहित्य यापर्यंत पोहोचणे, ठळकपणे निदर्शनास येते, यामुळे असुरक्षिततेस प्रवृत्त केले जाते.

(३) परिवीक्षा अधिकारी मंडळाने दिलेल्या निर्देशांचे पालन करेल आणि त्यांच्याकडे खालील नमूद कर्तव्ये, कार्ये आणि जबाबदाऱ्या असतील.

(i) नमुना ६ मध्ये मुलांचे सामाजिक अन्वेषण करणे.

(ii) मंडळे आणि बाल न्यायालये यांच्या कामकाजास उपस्थित राहणे आणि जेव्हा आवश्यकता असेल तेव्हा अहवाल सादर करणे.

(iii) बालकांच्या समस्या स्पष्ट करणे आणि संस्थेतील जीवनातील त्यांच्या समस्यांकडे लक्ष देणे.

(iv) दिशानिदेशन, संनियंत्रण, शिक्षण, व्यावसायिक आणि पुनर्वसन कार्यक्रमांमध्ये सहभागी होणे.

(v) बालक आणि प्रभारी अधिकारी यांचेमध्ये सहकार्य आणि सामंजस्य

प्रस्थापित करणे.

(vi) बालकास त्याच्या कुटुंबासोबत संबंध वाढविण्यास सहाय्य करणे आणि कुटुंबातील सदस्यांना देखील मदत करणे.

(vii) पूर्व मुक्तता कार्यक्रमांमध्ये सहभागी होणे आणि बालकास संबंध प्रस्थापित करण्यास मदत करणे, ज्यामुळे सुटकेनंतर बालकास भावनिक आणि सामाजिक आधार मिळू शकेल.

(viii) सामाजिक अन्वेषण अहवाल प्राप्त करणे, पर्यवेक्षण आणि पाठपुरावा करण्यासाठी इतर जिल्हे आणि राज्य यांमधील परिवीक्षा अधिकारी यांच्यासोबत संबंध प्रस्थापित करणे.

(ix) मुलांचे पुनर्वसन आणि सामाजिक पुनर्एकात्मीकरण सुकर करण्यासाठी आणि आवश्यक पाठपुरावा सुनिश्चित करण्यासाठी स्वयंसेवी कार्यकर्ते आणि संस्थांशी संबंध प्रस्थापित करणे.

(x) मुलांच्या सुटकेनंतर नियमितपणे पाठपुरावा करणे आणि त्यांना सामाजिक मुख्य प्रवाह परत आणणे सुकर होण्यासाठी त्यांना मदत आणि मार्गदर्शन करणे.

(xi) मुलांसाठी वैयक्तिक काळजी योजना आणि सुटकेनंतरची काळजी योजना तयार करणे.

(xii) वैयक्तिक काळजी योजनेनुसार परिविक्षा कालावधीतील मुलांची देखरेख करणे.

(xiii) त्यांच्या देखरेखीखाली असलेल्या अशा मुलांच्या निवासीस्थानी आणि नोकरीच्या ठिकाणी किंवा तो जात असलेल्या शाळेच्या ठिकाणी नियमितपणे भेट देणे आणि नमुना १० प्रमाणे नियतकालिक अहवाल सादर करणे.

(xiv) शक्य असेल तेथे मुलांसोबत मंडळाच्या कार्यालयापासून ते निरीक्षण गृहे, विशेष गृहे, सुरक्षिततेचे ठिकाण किंवा योग्य सुविधा असलेल्या ठिकाणी प्रकारणपरत्वे जाणे.

(xv) वेळोवेळी सुरक्षिततेच्या ठिकाणी असलेल्या मुलांच्या प्रगतीचे मूल्यमापन करणे आणि मानसिक सामाजिक मुद्दे समाविष्ट असलेला अहवाल तयार करणे आणि सदर अहवाल हा बाल न्यायालय यांना अग्रेषित करणे.

(xvi) बाल न्यायालयाने नियुक्त केलेल्या देखरेखा प्राधिकरणाची कामे पार पाडणे. (xvii) त्यांनी भेट दिलेली ठिकाणे, त्यांनी तयार केलेले सामाजिक अन्वेषण अहवाल, त्यांनी केलेला पाठपुरावा आणि त्यांनी तयार केलेला पर्यवेक्षण अहवाल अशा त्यांच्या दैनंदिन कामकाजाची नोंद ठेवण्यासाठी डायरी किंवा रजिस्टर सुस्थितीत ठेवणे.

(xviii) सामुदायिक सेवेचा पर्याय ओळखणे आणि मुलांचे पुनर्वसन आणि सामाजिक पुनर्एकात्मीकरण सुकर करण्यासाठी स्वयंसेवी क्षेत्राशी संबंध प्रस्थापित करणे आणि

(xix) त्यांना सोपवलेली इतर कोणतेही काम."

७५. वरील तरतुदीच्या वाचनावरून हे स्पष्ट होते की, कायद्याशी संघर्ष करणाऱ्या बालकांना पुरेशी कायदेशीर मदत देणे आणि बाल न्याय मंडळासमोर निःपक्षपाणीपणे सुनावणी केली जावी आणि चौकशी अशा पद्धतीने केली जावी की, कायद्याशी संघर्ष करणाऱ्या बालकांचे पुनर्वसन हितावह होईल, याची सुनिश्चिती करण्यामध्ये परिवीक्षा अधिकारी यांची भूमिका महत्वपूर्ण आहे. त्या दृष्टीने वैयक्तिक काळजी योजना आणि सुटकेनंतरची योजना याला अनन्यसाधारण मदत प्राप्त होते आणि यात परिवीक्षा अधिकारी यांची भूमिका महत्वपूर्ण असते.

७६. पुन्हा एकदा, परिविक्षा अधिकाऱ्यास, पुरेसे प्रशिक्षण, संवेदनशीलता आणि त्याच्या किंवा तिच्या कर्तव्ये आणि जबाबदाऱ्या याची जाणीव करून देणे हे अत्यंत महत्त्वाचे आहे. एनएएलएसएने या संदर्भात परिवीक्षा अधिकाऱ्यांसाठी प्रशिक्षण मॉड्युल (नियामक) तयार करून महत्वपूर्ण योगदान दिले आहे. प्रौढ शिक्षण तंत्र, प्रशिक्षण पद्धती, अभ्यासक्रम आणि अभ्यासक्रमाची सामग्री यामध्ये सुधारणा करून एनएएलएसएने सुचविलेल्या धर्तीवर परिवीक्षा अधिकाऱ्यांना प्रशिक्षण दिले जावे, याचे सुनिश्चिति सर्व राज्य सरकारे तसेच एमडब्ल्यूसीडी यांनी करावी, अशी आमची अपेक्षा आहे.

७७. सर्व पक्षकारांसाठी विद्वान वकिलांनी सादर केलेली निवेदने आणि बाल न्याय मंडळे यांच्याशी संबंधित आमची मते आणि निष्कर्ष सीडब्ल्यूसीला तितकीच लागू आहेत आणि त्याचा पुनःउच्चार करण्याची आवश्यकता नाही. परंतु, हे लक्षात घेतले पाहिजे की, राज्य विधी सेवा प्राधिकरणाला सीडब्ल्यूसीला मदत करण्यासाठी कायदेशीर मदत करणाऱ्या

वकिलांची नियुक्ती करण्याची गरज नाही. हे प्रत्येक प्रकरणावर आणि फक्त न्यायमित्र म्हणून, गरज उद्भवल्यास, सीडब्ल्यूसीला कायद्यांच्या प्रश्नांवर सल्ला देण्याच्या उद्देशासाठी अवलंबून असेल.

७८. आम्हाला काहीसे दुर्दैवाने कळविण्यात आले होते की, बालकल्याण समित्या कधीकधी 'द्वितीय श्रेणी संस्था' म्हणून समजल्या जातात आणि मानधनाचे प्रदान ज्यांना नियमितपणे केले जात नाही. याशिवाय, त्यांना अत्यंत नित्कृष्ट पायाभूत सुविधा असलेल्या इमारतींमध्ये त्यांच्या बैठका घेण्यासाठी भाग पाडले जाते. जेथे अधिनियमाच्या कामकाजाबद्दल हे दुःखद भाष्य आहे आणि त्याची पूर्ण जबाबदारी संबंधित राज्य सरकारांवर आहे. त्यांनी या परिस्थितीवर उपाययोजना करायला हवी.

(iv) तंत्रज्ञानाचा वापर

७९. बाल न्याय मंडळे तसेच सीडब्ल्यूसी या दोघांकडून तंत्रज्ञानाचा वापर अत्यंत महत्त्वाचा आहे आणि बाल न्याय मंडळे आणि सीडब्ल्यूसीकडे संगणक आणि आनुषंगिक साधने यांची अतिशय कमतरता आहे, असे एमडब्ल्यूसीडीने केलेल्या प्रतिज्ञापत्रे व निवेदनावरून आम्हाला लक्षात आल्यामुळे आम्ही निराश झालो आहोत. बाल न्याय मंडळे आणि सीडब्ल्यूसीच्या प्रभावी कामकाजासाठीच नव्हे तर, हरवलेल्या मुलांचा शोध आणि मागोवा घेणे, जोखमीच्या उद्योगात काम करणारी मुले, अपव्यापार झालेली मुले, मुलांची काळजीवाहू संस्था सोडलेली मुले, लैंगिक शोषणाला बळी पडलेली मुले, पाठपुरावा कारवाई आणि इतर विविध अशा संबंधित मुद्द्यांशी असे वेळोवेळी उद्भवणारे मुद्दे हाताळण्यासाठी, तंत्रज्ञान महत्वाचे आहे.

आपला देश हा तंत्रज्ञानाचे शक्तिस्थान आहे हे सर्वज्ञात आहे आणि जर आपण आपल्याकडे उपलब्ध असलेल्या साधनसंपत्तीचा फायदा घेऊ शकत नसलो आणि संगणक व इंटरनेटच्या माध्यमातून तंत्रज्ञानाच्या फायदयांचा पुरेपूर वापर मुलांच्या हितासाठी करता आला नाही तर तंत्रज्ञानाचे शक्तिस्थान म्हणून आपला दर्जा धोक्यात येईल आणि तो केवळ कागदावरच राहील. माहिती, विशेषतः आपण ज्या प्रकारच्या परिमाणाशी संबंधित आहोत ती, संगणक आणि इंटरनेटच्या वापराद्वारे सहजपणे संकलित केली जाऊ शकते. त्यामुळे साधनसंपत्तीचे नियोजन आणि व्यवस्थापन करण्यासाठी मोठी मदत होईल आणि एमडब्ल्यूसीडी आणि बाल हक्कांशी संबंधित इतरांनी याचा पुरेपूर फायदा घ्यावा.

८०. याशिवाय, संगणक आणि त्यासंबंधीची उपकरणे यांचा वापर जेजेबी आणि सीडब्ल्यूसी च्या प्रशासकीय कामकाजात प्रचंड योगदान देईल, यात शंका असू शकत नाही. भारत सरकार आणि राज्य सरकार या दोघांनीही याकडे लक्ष देण्याची गरज आहे आणि स्पष्ट कारणांसाठी जेजेबी आणि सीडब्ल्यूसी ला आवश्यक सॉफ्टवेअर आणि हार्डवेअर चा पुरवठा केला पाहिजे. आम्हाला विद्वान वकिलांद्वारा अशी माहिती देण्यात आली की, तेलंगणा आणि आंध्रप्रदेश मधील पोलीस प्राधिकरणांना उच्च न्यायालयाच्या न्याया समितीशी सल्लामसलत करून माहिती व दळणवळण तंत्रज्ञानाचा पुष्कळ वापर केला असून नाविन्यपूर्ण पावलांना प्रोत्साहन दिले पाहिजे, असे आमचे मत आहे. त्याचप्रमाणे, जेथे कायदयाशी संघर्ष करणाऱ्या अल्पवयीन मुलांची काही गैरसोय व्हिडिओ कॉन्फरन्सिंग सुविधांचा वापर करण आवश्यक करते, तिथे व्हिडिओ कॉन्फरन्सिंगच्या वापराचा विचार योग्य प्रकरणांमध्ये देखील

विचारात घेतला जाऊ शकतो.

८१. तंत्रज्ञानाच्या वापराच्या संदर्भात, ऑनलाइन पद्धतीने केंद्रीय स्तरावर देखरेख यंत्रणा आणल्याबद्दल एमडब्ल्यूसीडी ची प्रशंसा करणे आवश्यक आहे. आम्हाला विद्वान अतिरिक्त सॉलिसिटर जनरल यांनी सांगितले आहे की, ही ऑनलाईन प्रणाली प्रभावीपणे काम करत आहे, तरी महिने जसजसे जात आहेत तसतसे त्यात वेळोवेळी सुधारणा करणे आवश्यक आहे. दुर्दैवाचा भाग असा आहे की, केंद्रीय स्तरावरील देखरेख यंत्रणेची माहिती अद्ययावत करण्यासाठी राज्य सरकारकडून फारसे सक्रिय सहकार्य होताना दिसत नाही. एडब्ल्यूसीडी ने दाखल केलेल्या आणि वर उल्लेखलेंल्या एका प्रतिज्ञापत्रात असे नमूद केले होते की, जवळपास प्रत्येक राज्य सरकारने २०१४-१५ या वर्षासाठी संबंधित माहिती भरली आहे, परंतु २०१५-१६ या कालावधीच्या संदर्भात प्रतिसाद कमी आहे. हे सांगण्याची गरज नाही की, माहिती अद्ययावत करणे अत्यंत महत्त्वाचे आहे, जेणेकरून कार्यक्षम नियोजन होऊ शकेल, त्यामुळे शेवटी मुलांच्या समस्यांचे चांगले व्यवस्थापन होईल. आम्ही नमूद करू शकतो की, राज्य सरकारने केंद्रीय स्तरावरील देखरेख यंत्रणेवरील माहिती तिमाहीतून एकदा भरणे आवश्यक आहे आणि निश्चितच ते अवघड काम असू शकत नाही.

(५) पोलिसांची भूमिका

८२. जेजे अधिनियमाची प्रभावीपणे अंमलबजावणी करण्यामध्ये स्थानिक पोलिस हा अत्यंत महत्त्वाचा सहभागीदार आहे. जेजे अधिनियमाच्या कलम १०७ नुसार प्रत्येक जिल्ह्यात बालकल्याण पोलीस अधिकाऱ्याची (संक्षिप्ततेसाठी 'सीडब्ल्यूपीओ') आणि बालकांसाठी

विशेष पोलीस पथकाची (संक्षिप्ततेसाठी 'एसजेपीयू') यांची नियुक्ती करणे बंधनकारक आहे. एसजेपीयू मध्ये बालकल्याण क्षेत्रातील कामाचा अनुभव असलेल्या दोन सामाजिक कार्यकर्त्यांचाही समावेश असावा, त्यापैकी एक महिला असावी. नियुक्तीची जबाबदारी राज्य सरकारवर आहे. जेजे अधिनियमाचे कलम १०७ खालीलप्रमाणे वाचावे.

"१०७. बालकल्याण पोलीस अधिकारी व बालकांसाठी विशेष पोलीस पथक.

(१) प्रत्येक पोलीस ठाण्यात सहाय्यक उपनिरीक्षक दर्जाच्या खाली नसलेला किमान एक अधिकारी, ज्याच्याकडे अभियोग्यता, उचित प्रशिक्षण आणि दिशानिदेशन असेल त्याला बालकल्याण पोलिस अधिकारी म्हणून केवळ बळीत बालकांबरोबर किंवा अयोग्य कृत्य करणाऱ्या मुलांच्या बाबतीत पोलीस, स्वयंसेवी आणि अशासकीय संस्थांच्या समन्वयाने नियुक्त केले जाऊ शकते.

(२) बालकांशी संबंधित पोलिसांची सर्व कर्तव्यें यात समन्वय ठेवण्यासाठी राज्य शासन प्रत्येक जिल्ह्यात व शहरात बालकांसाठी विशेष पोलीस पथकाची स्थापना करील, ज्याचा प्रमुख पोलीस उपाधीक्षक दर्जापेक्षा कमी किंवा अधिक दर्जाचा पोलिस अधिकारी असेल आणि ज्यात पोट कलम (१) अन्वये पदनिर्देशित केलेले सर्व पोलीस अधिकारी आणि बालकल्याण क्षेत्रात काम करण्याचा अनुभव

असलेले दोन सामाजिक कार्यकर्ते, ज्यामध्ये एक महिला समाविष्ट असेल.

(३) बालकांसाठी विशेष पोलीस पथकातील सर्व पोलीस अधिकाऱ्यांना विशेषतः बालकल्याण पोलीस अधिकारी म्हणून पदाधिष्ठित होताना त्यांची कार्ये अधिक प्रभावीपणे पार पडता यावी यासाठी त्यांना विशेष प्रशिक्षण दिले जाईल.

(४) बालकांसाठी विशेष पोलीस पथकात बालकांची प्रकरणे हाताळणाऱ्या रेल्वे पोलिसांचाही समावेश असेल.

८३. आम्हाला पक्षकारांच्या विद्वान वकिलांनी असे समजावून सांगितले की, अनेक राज्यांनी प्रत्यक्षात सीडब्ल्यूपीओ नियुक्त केले आहेत आणि एसजेपीयु ची स्थापना केली आहे. दुर्दैवाने त्यांची कर्तव्ये आणि जबाबदाऱ्या स्पष्टपणे ओळखल्या गेल्या नाहीत, परंतु सामान्यतः आदर्श नियमावलीच्या नियम ८६ मध्ये नमूद केल्या आहेत. आम्हाला असेही समजावून सांगण्यात आले आहे की, 'सीडब्ल्यूपीओ'आणि 'एसजेपीयु' साठी प्रभावी प्रशिक्षणाची कोणतीही प्रणाली विकसित झालेली नाही आणि त्यापैकी बऱ्याच केवळ प्रतीकात्मकपणे अस्तित्वात आहेत आणि केवळ कायद्द्याने अस्तित्वात असणे आवश्यक आहे. सीडब्ल्यूपीओ आणि एसजेपीयु ची कर्तव्ये आणि जबाबदाऱ्या विनिर्दिष्ट केल्या नाहीत किंवा ओळखल्या गेल्या नाहीत, आणि म्हणून आमच्या मते, पोलीस संशोधन आणि विकास विभाग आणि राष्ट्रीय पोलीस अकादमीने राज्य पोलीस अकादमींशी सल्लामसलत करून

सीडब्ल्यूपीओ आणि एसजेपीयु ची कर्तव्य आणि जबाबदाऱ्या ओळखण्याची वेळ आली आहे. या संदर्भात आपण हे लक्षात घ्यायला पाहिजे की, प्रत्येक पोलीस ठाण्याशी संलग्न बाल कल्याण अधिकारी आणि विशेष बाल पोलीस पथकाच्या सदस्यांना प्रशिक्षण देण्यासाठी मार्गदर्शक तत्वे एनएएलएसए नी तयार केली आहेत. कदाचित पोलीस संशोधन आणि विकास विभाग आणि पोलीस अकादमी मार्फत त्यांच्या प्रशिक्षणासाठी ही एक सुरुवात असू शकतो.

८४. ***'द मॅटर ऑफ लेटर ऑफ सनत कुमार सिन्हा (मुख्य समन्वयक), बाल सखा वि. मुख्य सचिव, बिहार सरकार आणि इतर***[6] मध्ये पाटणा उच्च न्यायालयासमोर करण्यात आलेल्या आरोपावरून प्रशिक्षणाचे महत्त्व लक्षात येते. या प्रकरणात असा आरोप करण्यात आला होता की, एका मुलाला मुख्य न्यायदंडाधिकारी समोर हजर करण्यासाठी पोलीस स्टेशन मधून दिवाणी न्यायालयात जाताना गणवेशातील पोलिसांनी त्याला हातबेड्या घातल्या होत्या. अधिक म्हणजे २००० च्या अधिनियमातील तरतुदींच्या विरोधात मुलांची ओळख उघड करण्यात आल्याचा आरोप करण्यात आला होता. अर्थात, पाटणा उच्च न्यायालयाने हा विषय गांभीर्याने घेतला पण अशी परिस्थिती अजिबात उद्धभवायला नको हवी होती आणि योग्य प्रशिक्षणाद्वारे आणि संवेदनशीलतेने टाळता आली असती.

८५. साधारणतः पोलिसांच्या संदर्भात असे सादर केले गेले की, आळीपाळी धोरणामुळे पुष्कळदा असे घडते की, एखाद्या पोलिस अधिकाऱ्याने, त्याचे किंवा तिचे प्रशिक्षण पूर्ण

6 मनू/बीएच/०३८४/२००८

केल्यानंतर, लगेचच त्या अधिकाऱ्याची दुसऱ्या विभागात बदली केली जाते. हा प्रयत्नांचा अपव्यय असून बदल्यामुळे निर्माण होणाऱ्या समस्या सोडविण्याचा एक मार्ग म्हणजे प्रत्येक राज्य पोलीस अकादमीने राज्यातील वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांच्या मार्गदर्शनाखाली नियमित प्रशिक्षण कार्यक्रम आयोजित करणे आणि राज्य सरकारने आपल्या अधिकाऱ्यांच्या सेवेचा योग्य वापर करावा.

८६. त्याचप्रमाणे मुलांना हाताळण्यासाठी भारत सरकारने रेल्वे पोलिसांना सहभागी करून घेणे आवश्यक आहे. या संदर्भात कोणतीही माहिती किंवा आधारसामग्री समोर येत नाही आणि पक्षकारांचे विद्वान वकील या पैलूंचा संबंध आहे तेवढ्यापुरती आम्हाला मदत करण्यास असमर्थ होते. रेल्वेच्या माध्यमातून भारत सरकारने काही प्रमाणात तत्परतेने या प्रकरणात लक्ष द्यावे, अशी आमची अपेक्षा आहे. आम्हाला विद्वान वकिलांनी सांगितले की, रेल्वे स्थानकांवर (आणि इतर ठिकाणी) पळून जाणारी मुले आणि अंमली पदार्थ घेणारी मुले, कचरा वेचणारी किंवा हमालीची कामे करताना रेल्वे स्टेशनवर मोठ्या संख्येने आढळतात. आमच्या समोर असे निवेदन सादर करण्यात आले की, त्याशिवाय सुद्धा अशा मुलांमध्ये अतिशय जास्त प्रमाणात अंमली पदार्थांचे सेवन चालू आहे. विशेषतः अशा मुलांसाठी आणि सामान्यतः कायद्याशी संघर्ष करणाऱ्या बालकांशी आणि काळजी व संरक्षणाची गरज असलेल्या मुलांसाठी व्यसनमुक्ती केंद्र स्थापन करण्यासाठी प्रयत्न केले पाहिजेत.

(६) मुलांची काळजीवाहू संस्था

८७. मुलांच्या काळजीवाहू संस्थेच्या संदर्भात बरेच काही सांगण्यासारखे आहे. त्यातील

अनेकजण खालावलेल्या (मोडकळीस) आलेल्या इमारतींमध्ये राहतात आणि किमान प्रमाणातही राहण्यास आरामदायी जवळजवळ उपयोगी नसतात. राज्य सरकारने हे समजलं पाहिजे की मुलांच्या काळजीवाहू संस्थांमध्ये मुलांना ठेवून ते कोणतीही मदत करत नाहीत. ते केवळ त्यांची संविधिक व घटनात्मक कर्तव्य पार पाडत आहेत. त्यामुळे प्रत्येक राज्यातील सर्व मुलांच्या काळजीवाहू संस्थांचे मूल्यमापन करून त्यांची स्थिती, आवश्यक पायाभूत सुविधा आणि कर्मचाऱ्यांच्या गर j जा याची निश्चिती करण्याची तातडीची गरज आहे. मुले या संस्थांमध्ये राहतात, त्यांना पाहिजे म्हणून नाही तर त्यांच्याकडे दुसरा कोणताही पर्याय नाही, कारण त्यापैकी बहुतेक मुलांना काळजी आणि संरक्षणाची गरज आहे. या मुलांना दिलासा देणे आणि त्यांचे सांत्वन करणे आणि काळजीच्या किमान मानकांचे पालन करण्यासाठी निष्ठावंत राहणे हे समाजाचे कर्तव्य आहे. आदर्श नियमावली मध्ये सुधारित मुलांच्या काळजीवाहू संस्था आणि त्यांच्या गरजा यांच्या तपशीलाचा अंतर्भाव आहे. राज्य सरकारांनी फक्त या किमान गरजांचे पालन करावे. राज्य सरकारद्वारा संचालित काही मुलांची काळजी वाहू संस्थांच्या परिस्थितीचे उत्तम उदाहरण पंजाब आणि हरियाणा उच्च न्यायालयाने, त्यांनी ***स्वतंत्र स्वाधिकारे दखल घेतलेले प्रकरण विरुद्ध पंजाब सरकारच्या*** (उपरोल्लेखित) न्यायालयीन प्रकरणाच्या निरीक्षणात खालील प्रमाणे केले आहे.

> ",,,,सदर निरीक्षण गृहाची अत्यंत दयनीय अवस्था असे वर्णन करते की, सोनीपत येथील निरीक्षणगृहात दोन बराक आणि दोन उंच भिंती असलेले समोरच्या बाजूचे अंगण होते. प्रवेशद्वार तुरुंगाच्या गेटसारखेच

होते. या निरीक्षणगृहात ठेवण्यात आलेल्या बालकांसाठी मनोरंजनाच्या सोयी किंवा क्रीडांगण नव्हते. जलनि:सारण पद्धतीत अडथळा आल्यामुळे अंगण साचलेल्या पाण्याने भरले होते आणि अंगण वापरण्यासाठी बराक मधून बाहेर जाण्यासाठी जवळजवळ जागा नव्हती. चौकशीमध्ये असे समोर आले की, त्या ठिकाणी पिण्याच्या पाण्याची व्यवस्था नव्हती. स्नानगृह आणि स्वयंपाकघर यांची अवस्था देखील खेदजनक होती. निरीक्षणगृहाचे व्यवस्थापन एकच शिक्षक करत होते, जे शिक्षकाचे काम करण्याबरोबरच निरीक्षण गृहाचा संपूर्ण कारभारही पाहत होते. अशाप्रकारे मुलांना कोणतेही अर्थपूर्ण शिक्षण दिले जात नव्हत. निरीक्षणगृह तुरुंगापेक्षाही वाईट असल्याचे आढळून आले. होशियारपुर (पंजाब) येथील निरीक्षणगृह अशाच चांगल्या स्थितीत नव्हते आणि जवळजवळ मोडकळीस आलेल्या स्थितीत आढळले....”

८८. शिक्षणाकरीता तरतूद करणे, आरोग्य-काळजी (शारीरिक आणि मानसशास्त्रीय दोन्ही) सेवा आणि पुरेसा पोषाहार पुरविणे अशी अतिरिक्त कर्तव्ये आणि जबाबदाऱ्या अर्थातच राज्य सरकारवर राज्यघटनेने बंधनकारक केल्या आहेत. संरक्षण आयोग बाल हक्क अधिनियम २००५ आणि जेजे अधिनियमांतर्गत स्थापन करण्यात आलेल्या संस्थांनी या मोठ्या क्षेत्रांची मनःपूर्वक देखरेख करण्याची गरज आहे. संपूर्ण बेहुरा सारखे संबंधित

नागरिक हे केवळ प्रणालीगत अंमलबजावणीतील त्रुटी आणि उणीवा ठळकपणे निर्देशनास आणू शकतात आणि आशा करतात की, राज्य सरकारे आणि संसदेने केलेल्या कायद्यांतर्गत स्थापन केलेल्या विविध संस्था, त्यांची कर्तव्ये आणि कार्ये पार पाडतील. परंतु अशा अपवादात्मक परिस्थितीत संसदेने केलेल्या कायद्याच्या अंमलबजावणीसाठी सार्वजनिक हिताच्या दृष्टीने सततचा परमादेश जारी करणे न्यायालयांना घटनात्मकदृष्ट्या बंधनकारक आहे, जी सरकारच्या अंमलबजावणी खात्याची प्राथमिक जबाबदारी आहे. जर अंमलबजावणी करणाऱ्या खात्याने संसदेच्या आदेशाची कदर न करता,सातत्याने त्याकडे दुर्लक्ष केले तर आपल्या देशातील मुलांचे केवळ नुकसानच होईल.

८९. या संदर्भात, आम्ही अधिक सांगतो की, एमडब्ल्यूसीडी ने व्यक्ती आणि एनजीओ द्वारा चालविला जाणाऱ्या मुलांच्या काळजीवाहू संस्था या बाल न्याय अधिनियमाच्या तरतुदीनुसार नोंदणीकृत आहेत्त, याची खात्री करण्यासाठी बरेच प्रयत्न केले आहेत. विद्वान अतिरिक्त सॉलीसीटर जनरल यांनी दिलेल्या माहितीप्रमाणे काही संस्थांकडून नोंदणीला काही प्रमाणात विरोध झाला आहे, याचे आम्हाला आश्चर्य वाटते आणि म्हणूनच आम्ही हे स्पष्ट केले पाहिजे की जोपर्यंत कायदा कायद्याच्या पुस्तकावर अस्तित्वात आहे तोपर्यंत त्याचे पालन केले पाहिजे. त्यापैकी काही मुलांची काळजी वाहू संस्थांना हे गैरसोयीचे असू शकेल परंतु काळजीची किमान मानके राखली जात आहेत आणि त्या संस्थांमधील मुलांची चांगल्या प्रकारे देखभाल होत आहे, याची खात्री करण्यासाठी नोंदणी करणे अनिवार्य आणि सार्वजनिक हिताचे आहे. आपण हे लक्षात घेतले पाहिजे की, मुलांच्या काळजीवाहू

संस्थांमधून उद्भवणाऱ्या बाल अपव्यापार आणि बाल लैंगिक अत्याचाराच्या अधूनमधून होणाऱ्या आरोपांची नोंद आपणास घेता येईल, त्यापैकी काही आरोप पडताळणी न केलेले सुद्धा असतील, परंतु असे लज्जापूर्वक आरोप टाळण्याकरिता, त्यांची नोंदणी, त्यांचे व्यवस्थापन आणि त्यांच्या कार्याशीलतेचे सनियंत्रण राज्य सरकारकडून आणि एमडब्ल्यूसीडी कडून काटेकोरपणे होणे आवश्यक आहे.

९०. विद्वान वकिलांनी असे सुचविले होते की, सर्व मुलांच्या काळजीवाहू संस्थांमध्ये मुलांचे वयानुसार विलग्निकरण असावे आणि जेथे जेथे लागू असेल तेथे विलग्निकरन हे केलेल्या गुन्ह्याच्या स्वरूपावर आधारित असावे, जेणेकरून लैंगिक शोषण किंवा इतर कोणत्याही प्रकारचा हिंसाचार दूर होण्याची शक्यता आहे. तसेच, कायद्याशी संघर्ष करणारे मुले आणि काळजी व संरक्षणाची गरज असलेल्या बालकांचे त्यांना समाजात पुन्हा एकत्र आणून मुख्य प्रवाहात आणण्याच्या दृष्टीने अशा सर्व संस्थांना व्यवसायिक किंवा सातत्यपूर्ण शिक्षण देण्याचा सल्ला देण्यात यावा, हे सर्व गंभीर चिंतेचे मुद्दे आहेत आणि राज्य सरकारे आणि एससीपीआर ने त्यांची दखल घेणे गरजेचे आहे.

९१. यावर जोर देण्यात आला की, सर्व मुलांच्या काळजीवाहू संस्थांमध्ये पुरेसा कर्मचारीवर्ग असावा, जेणेकरून त्यांना आपली कर्तव्ये कार्यक्षमतेने पार पाडता येतील. मुलांना वैधानिक संस्था समोर हजर होण्यासाठी लांबचा करावा लागणारा प्रवास टाळण्यासाठी असेही सुचविण्यात आले होते की, जेजेबी आणि सीडब्ल्यूसी ची जागा मुलांच्या काळजीवाहू संस्थांच्या जवळ असावी. विद्वान वकिलांनी केलेल्या सर्व सूचना आणि

शिफारशी हे चिंतेचे मुद्दे आहेत आणि याची दखल राज्य सरकारे आणि एससीपीसीआर ने त्याची दखल कर्तव्यतत्परतेणे घेतलीच पाहिजे.

९२. मुलांच्या काळजीवाहू संस्थेबाबत सादर केलेल्या निवेदनात एक निवेदन असे होते की, जिल्हा विधी सेवा प्राधिकरणांनी ते प्रत्यक्षात हवे तसे काम करीत आहे की नाही याची खातरजमा करण्यासाठी त्यांना अचानक भेट दयावी. आमचे असे मत आहे की 'अभ्यागत' प्रणाली अंमलात आणणे महत्त्वाचे आहे आणि आम्ही एनएएलएसए कडून अशी अपेक्षा करतो की, त्यांनी दिलेल्या सूचनेनुसार पुढे जावे. वस्तुतः २००६ मधील मुख्य न्यायमूर्तींच्या परिषदेत मुलांच्या काळजीवाहू संस्थांमध्ये अभ्यागतांच्या नियुक्ती संबंधात विनिर्देशपूर्वक लक्ष वेधण्यात आले होते आणि २०१३ आणि २०१५ मध्ये झालेल्या मुख्य न्यायमूर्तींच्या परिषदेतही मुलांच्या काळजीवाहू संस्थांमधील राहणीमान सुधारण्याकडेही लक्ष वेधण्यात आले. एनएएलएसए आणि जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाने मुख्य न्यायाधीशांच्या परिषदेत व्यक्त केलेल्या मतांचा आदर केलाच पाहिजे.

(७) बाल न्याय निधी

९३. जेजे अधिनियमात बाल न्याय निधीची तजवीज करण्याची तरतूद आहे. विद्वान अतिरिक्त सॉलीसीटर जनरल यांनी बाल न्याय निधीतील राज्य सरकारांच्या हिश्यासंबंधी आकडेवारी आमच्यासमोर ठेवली. आम्हाला हे नमूद करण्यात दुःख वाटते की, काही राज्य सरकारांनी बाल न्याय निधीची उभारणीही केलेली नाही, तर एक किंवा दोन राज्य सरकारांनी केवळ काही हजार रुपयांच्या लाजिरवाण्या रकमेचा हा निधी उभारला आहे. या राज्य

सरकारांकडून अशा अपुऱ्या निधीमधून मुलांच्या कल्याणाकडे कसे लक्ष दिले जाऊ शकते, याचे आम्हाला आश्चर्य वाटते. ह्या राज्य सरकारांना मुलांच्या कल्याणाची गांभीर्याने चिंता नाही हे उघड आहे. ही दुर्दैवाची गोष्ट आहे. मुलांच्या हक्कांविषयी सरकारी उदासीनतेचे हे आणखी एक उदाहरण आहे आणि चिंतेचे कारण आहे.

(८) मूल्यमापन आणि पडताळणी

९४. शेवटी जेजे अधिनियमाच्या अंमलबजावणीवर लक्ष ठेवण्यासाठी आणि देखरेख करण्यासाठी पुढील काही वर्षे, दर सहा महिन्यांनी काही प्रकारचे मूल्यमापन किंवा सामाजिक लेखापरीक्षण करणे योग्य ठरेल. २००० चा अधिनियम संसदेने लागू केल्यापासून पुरेसा काळ आधीच लोटला आहे आणि निश्चितच आपल्या देशातील मुले अधिक चांगली वागणूक मिळण्यास लायक आहेत आणि जेजे अधिनियमाच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी आणखी १५ किंवा १६ वर्षे थांबू शकत नाहीत. २००० चा अधिनियम लागू झाला तेव्हा जन्माला आलेली बहुतेक मुले प्रौढत्वाच्या जवळ आली आहेत आणि त्यापैकी अनेकांना २००० च्या अधिनियमातील तरतुदींचा लाभ मिळालेला नाही. ही चूक, जी गंभीर आहे त्याची जेजे अधिनियमाच्या अंमलबजावणीत पुनरावृत्ती करता येऊ शकत नाही. असे म्हटले आहे की, मुले ही देशाचे भवितव्य असून त्यांची काळजी घेतली नाही तर देशाचे भवितव्य धोक्यात असेल.

निष्कर्ष आणि निर्देश

९५. सर्व विद्वान वकिलांनी व्यक्त केलेली चिंता आणि देशातील बाल न्यायसंस्थेला बळ

देण्याची गरज लक्षात घेऊन, आमचे असे मत आहे की खालील निदेश दयायला पाहिजेत आणि आम्ही तसे करतो.

१. भारत सरकारच्या महिला व बाल विकास मंत्रालय आणि राज्य सरकारांनी एनसीपीसीआर आणि एससीपीसीआर मधील सर्व पदे वेळेत भरली जात आहे आणि या वैधानिक संस्थांना पुरेसा कर्मचारी वर्ग पुरवला जात आहे याची खात्री करावी जेणेकरून ते मुलांच्या हितासाठी प्रभावीपणे आणि अर्थपूर्ण रित्या कार्य करतील.

२. एनसीपीसीआर आणि एससीपीसीआर ने संसदेने त्यांच्यावर ठेवलेला विश्वास लक्षात घेऊन, त्यांची कर्तव्ये, कार्ये आणि जबाबदाऱ्या अत्यंत कळकळीने पार पाडाव्यात. या वैधानिक संस्थांमधील पद हे विनाश्रमपद नाही. देशभरातील मुलांचे जीवन सुधारण्यात संस्थांची महत्वाची आणि सक्रिय भूमिका आहे.

३. पोषण, शिक्षण, वैद्यकीय लाभ, कौशल्य विकास आणि सर्वसाधारण राहणीमानाच्या स्थितीसह सर्व बाबतीत मुलांच्या कल्याणास हितावह अशा पद्धतीने मुलांच्या काळजीवाहू संस्थांचे व्यवस्थापन केले जाते आणि त्या चालविल्या जातात आणि जेजे अधिनियम प्रभावीपणे अंमलात आणला जात आहे, याची खात्री करण्याची मोठी जबाबदारी राज्यस्तरीय बालसंरक्षण सोसायट्या आणि जिल्हास्तरीय बाल संरक्षण पथकावर आहे. जेजे अधिनियम ज्या उद्देशासाठी संसदेने केलेला आहे तो उद्देश जेजे अधिनियमामुळे साध्य होत आहे, याची खात्री करण्यासाठी या दोन संस्थांना एनजीओ आणि नागरी संस्थांची मदत घेण्यास सल्ला दिला जाईल.

४. जेजेबी आणि सीडब्ल्यूसी मधील सर्व पदे आदर्श नियमावलीनुसार किंवा राज्य सरकारने तयार केलेल्या नियमानुसार शीघ्रतेने भरली जातील, याची खात्री राज्य सरकारने केली पाहिजे. पदे भरण्यास कोणताही उशीर झाल्यास त्याचा प्रतिकूल परिणाम मुलांवर होऊ शकतो आणि हे टाळले पाहिजे.

५. जेजेबी आणि सीडब्ल्यूसी ने हे समजले पाहिजे की, नियमित बैठका घेणे आवश्यक आहे, जेणेकरून कोणत्याही वेळी कमीत कमी चौकशी प्रलंबित असतील आणि कायदयाशी संघर्ष करत असलेल्या मुलांना न्याय मिळेल आणि काळजी आणि संरक्षणाची गरज असलेल्या मुलांना सामाजिक न्याय मिळेल, हे एक घटनात्मक बंधन आहे.

६. एनसीपीसीआर आणि एससीपीसीआर यांनी जेजे अधिनियमानुसार योग्य वाटणाऱ्या निरनिराळ्या मुद्द्यांवर कालबद्ध अभ्यास केला पाहिजे. या अभ्यासाच्या आधारे राज्य सरकारांनी आणि केंद्रशासित प्रदेशांनी सुधारणात्मक पावले उचलायला पाहिजेत.

७. विशेषतः जेजे अधिनियमाच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी आवश्यक असलेल्या परिवीक्षा अधिकाऱ्यांच्या संख्येचा अंदाज घेण्यासाठी एनसीपीसीआर आणि एससीपीसीआर ने अभ्यास केला पाहिजे. या अभ्यासाच्या आधारे, राज्य सरकारने आवश्यक इतक्या संख्येने परिवीक्षा अधिकाऱ्याची नियुक्ती केलीच पाहिजे. कायदयाशी संघर्ष करणाऱ्या मुलांच्या पुनर्वसनासाठी आणि पुर्नएकात्मिकरणासाठी

परिवीक्षा अधिकाऱ्यांची भूमिका महत्त्वाची आहे, यावर जोर दिला पाहिजे आणि राज्य सरकारे आणि केंद्रशासित प्रदेशांनी तयार केलेली आदर्श नियमावली आणि नियमांमध्ये आधारतत्व म्हणून मांडलेल्या त्यांच्या कर्तव्यांना, जर काही असल्यास, योग्य ते महत्त्व दिले पाहिजे.

८. एमडब्ल्यूसीडी ने माहिती व संप्रेषण तंत्रज्ञानाचा सर्जनशील वापर फक्त माहिती गोळा करण्याचे उद्देशाने नाही तर जेजे अधिनियमाशी संबंधित इतर मुद्दे जसे की हरवलेल्या, अपव्यापार केलेल्या मुलांची माहिती आणि दत्तक प्रकरणांचा पाठपुरावा इत्यादी साठी करावा. तंत्रज्ञानाच्या पुरेपूर वापर केल्यावर प्रशासकीय कार्यक्षमतेत लक्षणीय सुधारणा होईल, ज्याचा मुलांच्या आयुष्यावर सकारात्मक परिणाम होईल.

९. मुलांनी केलेले गुन्हे तसेच मुलांच्या विरुद्ध केलेले गुन्हे यावरील मुद्द्यांबाबत पहिले प्रतिसाद देणारे म्हणून पोलिसांनी आपली भूमिका ओळखणे महत्त्वाचे आहे. म्हणून केवळ कागदोपत्री न ठेवता, लवकरात लवकर जेजे अधिनियमानुसार अर्थपूर्ण बालकांसाठी विशेष पोलीस पथक स्थापन करून बालकल्याण पोलीस अधिकाऱ्याची नेमणूक करणे गरजेचे आहे. या संदर्भात अशा पथकांची आणि अधिकाऱ्यांची कर्तव्ये आणि जबाबदाऱ्या ओळखणे आवश्यक आहे आणि जिथे जिथे आवश्यक आहे तेथे राष्ट्रीय पोलीस अकादमी किंवा पोलीस संशोधन आणि विकास विभाग किंवा एनजीओ यांपैकी उपलब्ध तज्ञांचे मार्गदर्शन मुलांच्या हितासाठी घेण्यात यावे.

१०. राष्ट्रीय पोलीस अकादमी आणि राज्य पोलीस अकादमीने, बाल हक्कांचा एक

वेगळी आणि प्राथमिक बाब म्हणून नव्हे तर त्यांच्या अभ्यासक्रमाचा एक भाग म्हणून नियमितपणे समावेश करण्याचा विचार केला पाहिजे.

११. मुलांच्या काळजीवाहू संस्थांचे व्यवस्थापन अत्यंत महत्त्वाचे आहे आणि राज्य सरकारे व केंद्रशासित प्रदेशांना अशा सर्व संस्थांची नोंदणी झाली आहे का, याची खात्री करण्याचा सल्ला दिला जाईल, जेणेकरून या संस्थांमध्ये मुले आदरणीय जीवन जगू शकतील आणि हरवलेली मुले आणि अपव्यापार या मुद्द्यांकडे देखील लक्ष दिले जाईल.

१२. राज्य सरकारांनी आणि केंद्रशासित प्रदेशांनी सर्व जिल्ह्यातील मुलांच्या काळजीवाहू संस्थांवर लक्ष ठेवण्यासाठी आणि देखरेख करण्यासाठी नागरी समाजातील प्रतिष्ठित व्यक्तींची अभ्यागत म्हणून नियुक्ती करण्याचा सल्ला दिला जाईल. यामुळे याची खात्री करता येईल की, अशा संस्थाचे व्यवस्थापन आणि देखभाल यांची दखल घेतली जात आहे आणि राज्य विधी सेवा प्राधिकरण आणि जिल्हा विधी सेवा प्राधिकरण या उपक्रमात शासकीय प्राधिकरणांना तसेच अभ्यांगगताना पूर्ण मदत व सहकार्य करतील यात शंका नाही.

१३. राज्य सरकारे आणि केंद्रशासित प्रदेशांच्या प्रभावी प्रतिसादाच्या अभावी, बाल न्याय निधी ही काहीशी संकोच निर्माण करणारी बाब आहे. जर मुलांच्या कल्याणासाठी आर्थिक संसाधने उपलब्ध करून दिली जात नसतील तर, निधीचा अधिक चांगला उपयोग काय होऊ शकतो, याचा विचार करणे हे आम्हाला भयावह

वाटते.

१४. जेजे अधिनियमाशी संबंधित आकडेवारी आणि माहिती गोळा करताना एनएएलएसए ने उल्लेखनीय काम केले आहे, हे या संस्थेने तयार केलेल्या तीन भागाच्या अहवालातून सिद्ध झाले आहे. आम्ही एनएएलएसए ला विनंती करतो की, त्यांनी हा उपक्रम पुढे सुरू ठेवावा आणि सर्व धोरण करणाऱ्या आणि निर्णय घेणाऱ्या प्राधिकरणांना त्यांच्या कामाची योजना करण्यास मदत होण्यासाठी शक्यतो ३० एप्रिल २०१८ च्या पूर्वी अशा प्रकारचा अहवाल पूर्ण करावा.

१५. प्रशिक्षणाच्या महत्वावर अतिजोर देता येणार नाही. बाल हक्क समजण्यासाठी आणि आकलन करण्यासाठी आणि जेजे अधिनियमाच्या प्रभावी अंमलबजावण्यासाठी हे अत्यंत महत्त्वाचे आहे. सर्व प्राधिकरणें जसे जेजेबी आणि सीडब्ल्यूसी, परिवीक्षा अधिकारी, बाल संरक्षण सोसायटी आणि जिल्हा बाल व संरक्षण युनिट्स चे सदस्य, बालकांसाठी विशेष पोलीस पथके, बाल कल्याण पोलिस अधिकारी आणि मुलांच्या काळजीवाहू संस्थेचे व्यवस्थापकीय कर्मचारी यांनी संवेदनशील राहावे आणि त्यांच्या दर्जाप्रमाणे त्यांना पुरेसे प्रशिक्षण द्यावे. याबाबत एनएएलएसए ने अतिशय सकारात्मक पाऊल उचललं आहे आणि आम्ही अशी अपेक्षा करतो की, एनसीपीसीआर ने एससीपीसीआर च्या मदतीने हा उपक्रम पुढे सुरू ठेवावा जेणेकरून जेजे अधिनियमाची अर्थपूर्ण अंमलबजावणी होईल.

१६. बाल हक्क आणि जेजे अधिनियमाच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी राज्य सरकारे

आणि केंद्रशासित प्रदेशाचा सहभाग महत्त्वाचा असल्याने, प्रत्येक उच्च न्यायालय आणि प्रत्येक उच्च न्यायालयाच्या बाल न्याय समितीने आपल्या राज्यातील मुलांच्या कल्याणासाठी सक्रिय भूमिका कायम ठेवावी. सहभाग आणि प्रक्रिया अधिक अर्थपूर्ण करण्यासाठी आम्ही प्रत्येक उच्च न्यायालयाच्या मुख्य न्यायमूर्तींना विनंती करतो की, बाल न्याय (मुलांची काळजी व संरक्षण) अधिनियम २०१५ च्या प्रभावी अंमलबजावणीसाठी स्वतःहून प्रकरणांची नोंदणी करावी, जेणेकरून संबंधित शासकीय प्राधिकरणांचे म्हणणे ऐकून घेतल्यानंतर, वैधानिक प्राधिकरणे आणि उच्च न्यायालयाच्या बाल न्याय समितीसमोर येणाऱ्या अडचणी असल्यास, त्याचे अर्थपूर्ण निराकरण होईल. या न्यायनिर्णयाची आणि आदेशाची प्रत या न्यायालयाच्या महासचिवांनी प्रत्येक उच्च न्यायालयाच्या महाप्रबंधक यांना पाठवून ती प्रत्येक न्यायालयाच्या मुख्य न्यायामूर्तीसमोर स्वाधिकारे कार्यवाही सुरू करण्यासाठी पाठवावी.

९६. शेवटी, आम्ही प्रत्येक उच्च न्यायालयाच्या मुख्य न्यायमूर्तींना विनंती आणि इच्छा व्यक्त करतो की, प्रत्येक जिल्ह्यात बालकांसाठी अनुकूल न्यायालय आणि संवेदनशील साक्षीदार न्यायालय स्थापन करण्याबाबत गांभीर्याने विचार करावा. जेजे अधिनियमांतर्गत चौकशा आणि लैंगिक गुन्ह्यांपासून बालकांचे संरक्षण अधिनियम २०१२, बालविवाह प्रतिबंधक अधिनियम २००६ सारख्या इतर कायद्यांतर्गत न्यायचौकशी आणि भारतीय दंड संहिता अंतर्गत लैंगिक गुन्ह्यांसाठी आणि इतर तत्सम कायद्यांतर्गत न्यायचौकशी ही

पिडीतेसाठी उच्च पातळीची संवेदनशीलता, काळजी आणि सहानुभूतीने चालविणे आवश्यक आहे. असे अनेकदा म्हटले जाते की, एखाद्या गुन्ह्यातील अल्पवयीन आरोपी किंवा लैंगिक गुन्ह्यातील बळी यांचा आपल्या न्यायालयातील अनुभव अत्यंत कलेशकारक असतो. आपल्याला त्यांच्याबद्दल थोडी सहानुभूती बाळगणे आवश्यक आहे. अगदी कायदयाशी संघर्ष करत असलेल्या बालकांसाठीही, कारण ते निर्दोष म्हणून गृहीत धरण्यासाठी हक्कदार आहेत आणि बालकांसाठी अनुकूल न्यायालये आणि संवेदनशील साक्षीदार न्यायालयाची स्थापना ही कदाचित एक अशी पद्धत आहे, ज्याद्वारे न्यायवितरण प्रणाली त्यांच्या वेदना आणि दुःख कमी करण्यासाठी प्रतिसाद देऊ शकते. अशा बालकांसाठी अनुकूल न्यायालये आणि संवेदनशील साक्षीदार न्यायालयांचा आणखी एक फायदा म्हणजे त्यांचा उपयोग ज्या खटल्यांमध्ये प्रौढ स्त्रिया ह्या लैंगिक गुन्ह्यांना बळी पडलेल्या असतात अशा खटल्यांसाठी होतो कारण आपल्या न्यायालयात नसलेली अनुकूल रचना आणि वातावरण यांचा त्यांच्या मनावरही आघात होतो.

९७. या जनहित याचिकेत उपस्थित करण्यात आलेले मुद्दे ठळकपणे निदर्शनास आणल्याबद्दल आम्ही संपूर्णा बेहुरा यांची आणि उपस्थित पक्षकारांच्या विद्वान वकिलांनी हे प्रकरण विरोधासाठी न करता, आपल्या देशातील मुलांच्या फायद्यासाठी विधायक प्रयत्न म्हणून केल्याबद्दल आम्ही त्यांची प्रशंसा करतो.

९८. याचिका निकाली काढण्यात येत आहे.

९९. प्रत्येक उच्च न्यायालयाच्या महाप्रबंधकांकडून उत्तर प्राप्त झाल्यानंतर रजिस्ट्रीने (प्रबंधक कार्यालयाने) प्रकरण निदेशांसाठी १३ मार्च २०१८ ला सूचिबद्ध करावे.

..................न्या.

(मदन बी. लोकूर)

...................न्या.

(दिपक गुप्ता)

नवी दिल्ली

फेब्रुवारी ९, २०१८.

अस्वीकरण

या न्यायनिर्णयाच्या मराठी भाषेतील या अनुवादाचा वापर हा पक्षकारास त्याच्या/ तिच्या मातृभाषेमध्ये त्याचा अर्थ समजून घेण्यापुरताच मर्यादित राहील आणि त्याचा इतर कोणत्याही कारणाकरता वापर करता येणार नाही तसेच इंग्रजी भाषेतील न्यायनिर्णय हाच सर्व व्यावहारिक आणि कार्यालयीन वापराकरिता विश्वसनीय असेल आणि तोच त्यातील आदेशाच्या निष्पादन आणि अंमलबजावणी करता वैध मानला जाईल.

x-x-x-x